पुणे महानगरपालिका

**✻ स्थायी समिती ✻**

कार्यपत्रिका क्रमांक ५

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरुवार दि. ३/५/२००७** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.ज्योतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. १४३**

मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि. २०/४/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. १ धानोरी याठिकाणी स.नं. ६७ ही महाराष्ट्र शासनाची जागा असून सदरची जागा शासकीय दरानुसार पुणे महानगरपालिकेने विकत घेऊन पुणे मनपाच्या ताब्यात घेण्यात यावी. त्यामुळे पुणे मनपास काहीतरी योजना त्याठिकाणी राबविता येईल.

**विषय क्र. १४४**

मा.पृथ्वीराज सुतार व मा. उज्वल केसकर यांचे दि. २०/४/२००७ चे पत्र.

पुण्यातील अखिल भारतीय मराठा शिक्षण परीषद या संस्थेस शंभर वर्ष पूर्ण होत आहेत. गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी या संस्थेने फार मोठे मोलाचे कार्य केले आहे. त्याच प्रमाणे वृक्ष लागवड करुन पुण्याच्या वैभवात भर घातली आहे. यापूर्वीही पुणे मनपाने अनेक संस्थांना भरघोष मदत केली आहे. तरी मनपाने या संस्थेस शैक्षणिक कामासाठी र.रु. ५० लाखाची मदत करावी.

**विषय क्र. १४५**

मा. प्रा. विकास मठकरी, विरोधी पक्षनेता, मा. दिलीप उंबरकर व मा. दत्तात्रय खाडे यांचे दि. २३/४/२००७ चे पत्र.

१८५७ च्या स्वातंत्र्य समराला यंदा १५० वर्ष पूर्ण होत आहेत. तसेच स्वातंत्र्य वीर सावरकर लिखित १८५७ चे स्वातंत्र्य समर या पुस्तकाच्या लेखनाला १०० वर्ष पूर्ण झाली आहेत. त्या निमित्ताने दि. २७ ते ३० एप्रिल २००७ या कालावधीमध्ये गणेश कला क्रिडा मंच या सभागृहात आदरणीय आचार्य गोविंद देवजी गिरी महाराज मा. किशोरजी व्यास यांची स्वातंत्र्य समराची स्फूर्तिगाथा या ऐतिहासिक व्याख्यान मालेचे आयोजन सावरकर स्मृति प्रतिष्टान, पुणे यांनी केले आहे. तरी सदर कार्यक्रमाचे पुणे महानगरपालिकेने सहप्रायोजकत्व घ्यावे आणि गणेश कला क्रिडा मंच विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावे. पुणे महानगरपालिका - सावरकर स्मृति प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यान माला आयोजित करावी.

**विषय क्र. १४६**

मा. प्रा. विकास मठकरी, विरोधी पक्षनेता, व मा. दिलीप उंबरकर यांचे दि. २३/४/२००७ चे पत्र.

कोकण विकास प्रतिष्ठानच्या पुढाकाराने दरवर्षी राज्यात ठिकठिकाणी आंबा महोत्सव आयोजित करण्यात येतो. महाराष्ट्र शासनाच्या पणन महामंडळाचे देखील या महोत्सवास सहकार्य लाभत असते. हा महोत्सव पुण्यामध्ये बालगंधर्व आवार या ठिकाणी दि. ८ मे ०७ ते १५ मे ०७ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. तरी पुण्यात होणाऱ्या सदर महोत्सवात पुणे महानगरपालिकेने सहप्रायोजकत्व स्विकारावे व बालगंधर्व आवार त्यांना विनाशुल्क देण्यात यावे. पुणे महानगरपालिका - कोकण विकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने महोत्सव साजरा करावा.

**विषय क्र. १४७**

मा. संजय भोसले व मा. सागर माळकर यांचे दि. २३/४/२००७ चे पत्र.

शिवप्रेमी प्रतिष्ठान हे रजिस्टर संस्था असून सदर संस्थेमार्फत अनेक कार्यक्रम राबविले जातात. (उदा. नवरात्र उत्सव,पालकी सोहळा, शिवजयंती उत्सव, होतकरु व गरजू विद्यार्थ्यांना वह्या वाटप ) अशा प्रकारे सामाजिक, शैक्षणिक व क्रिडा क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करित आहे. सदर कार्य करित असताना संस्थेला जागेची निकड भासत आहे. तरी शिवप्रेमी प्रतिष्ठान या संस्थेस संगमवाडी स. नं. ६१ मधील अंदाजे ३० गुंठे जागा नाममात्र भाड्याने व दिर्घ कराराने देण्यात यावी.

**विषय क्र. १४८**

मा. राजेंद्र एंडल व मा. रविंद्र धंगेकर यांचे दि. २६/४/२००७ चे पत्र.

वॉ. क्र. १७ मधील पुणे महानगरपालिकेच्या सुभाष चंद्र बोस विद्यालयाची भिंत नवी खडकी गावाकडे जाणारी आत मध्ये घेऊन सदर रस्ता रुंद करण्यात यावा.

**विषय क्र. १४९**

मा. शंकरराव बेलदरे व मा. संदिप लडकत यांचे दि. २७/४/२००७ चे पत्र.

वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट ही महाराष्ट्रामधील अग्रगण्य संस्था पुण्यामध्ये कार्यरत आहे. सदर संस्थेमध्ये ऊसावर संशोधन चालते सदर ठिकाणच्या कर्मचारी वर्गास पिण्याचे पाण्याची सोय होण्याकरिता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मुंढवा ते वसंतदादा इन्स्टिट्युट पर्यंत पाण्याची लाईन टाकण्याचे कामाचे टेंडर मागविले असता ठेकेदार मे. प्रतिक कन्स्ट्रक्शन यांचे (टेंडर र.रु. ४८,५१,६८०/- चे ९.९०% कमी दराने) र.रु. ४३,६६,९९७=१७ पर्यंत काम करुन घेण्यास मा. स्थायी समिती ठराव क्र, ८२६, दि. १२/९/२००६ ने मान्यता देण्यात आलेली आहे. मा. महा. संचालक वसंतदादा इन्स्टिट्युट यांनी विषयांकित कामाकरिता पाण्याची लाईन टाकण्यास ५०% रक्कम रुपये २४,२५,८४०/- मनपाकडे जमा केलेले आहे. वरील ठिकाणी पाण्याची लाईन टाकल्यास वसंतदादा इन्स्टिट्युट तसेच मनपा हद्दीलगत व ग्रामपंचायतीस पाणीपुरवठा करणे शक्य होणार आहे. तरी या कामाकरिता उर्वरित रक्कम रुपये २४,२५,८४०/- पुणे मनपा कडून खर्च करण्यात यावी.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्रं. १५०**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. १६/१२/२००६ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. १४/४/२००७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/४० दि. २०/४/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्रं. १५१**

दि. ९/४/२००७ ते दि. १५/४/२००७ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ४१ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/७३ दि. २६/४/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्रं. १५२**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ९/१२/२००६ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ७/४/२००७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/४५ दि. २६/४/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्रं. १५३**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २/१२/२००६ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ३१/३/२००७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/४६ दि. २६/४/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**सेवकवर्गाची प्रकरणे**

**विषय क्रं. १५४**

नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज, नागपूर येथील ''डिव्हिजनल ऑफिसर्स कोर्स'' करिता अग्निशामक दलाकडील अधिकाऱ्यास पुणे म.न.पा. चे खर्चाने पाठविण्यास खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत. मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे क्र. मआ/सहआ/से/५५ दि. २१/४/२००७ चे पत्र.

१) अग्निशामक दलाकडील स्टेशन ड्युटी ऑफिसर सेवक श्री.दत्तात्रय नारायण नागलकर यांना माहे जून २००७ पासून सुरु होणाऱ्या अगर या वेळेस प्रवेश न मिळाल्यास त्यापुढील काळात सुरु होणाऱ्या नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज, नागपूर येथील २२ आठवडे कालावधीच्या ''डिव्हिजनल ऑफिसर्स कोर्स'' करिता पाठविणेस,

२) या कामी येणाऱ्या रुपये २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) तद्नुषंगिक खर्चास मान्यता मिळणेस,

३) पाठ्यक्रमासाठी जाणे - येणे व प्रशिक्षणाचा काळ हा सेवा - काळ धरणेस,

४) सेवकाकडून पाठ्क्रम पूर्ण करुन घेणेस, पाठ्यक्रम पूर्ण केल्यानंतर पुणे म.न.पा. अग्निशामक दलाच्या सेवेत १० वर्षे राहणे व बढतीच्या जागेवर हक्क न सांगणेबाबत बंधपत्र करुन घेणेस.

**विषय क्रं. १५५**

नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज, नागपूर येथील ''डिव्हिजनल ऑफिसर्स कोर्स'' करिता अग्निशामक दलाकडील अधिकाऱ्यास पुणे म.न.पा. चे खर्चाने पाठविण्यास खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत. मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/सहआ/से/५७ दि. २१/४/२००७ चे पत्र.

१) अग्निशामक दलाकडील स्टेशन ड्युटी ऑफिसर सेवक श्री. सुनिल तानाजी गिलबिले यांना माहे जून २००७ पासून सुरु होणाऱ्या अगर या वेळेस प्रवेश न मिळाल्यास त्यापुढील काळात सुरु होणाऱ्या नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज, नागपूर येथील २२ आठवडे कालावधीच्या ''डिव्हिजनल ऑफिसर्स कोर्स'' करिता पाठविणे,

२) या कामी येणाऱ्या रुपये २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) तद्नुषंगिक खर्चास मान्यता मिळणेस,

३) पाठ्यक्रमासाठी जाणे - येणे व प्रशिक्षणाचा काळ हा सेवा - काळ धरणेस,

४) सेवकाकडून पाठ्क्रम पूर्ण करुन घेणेस, पाठ्यक्रम पूर्ण केल्यानंतर पुणे म.न.पा. अग्निशामक दलाच्या सेवेत १० वर्षे राहणे व बढतीच्या जागेवर हक्क न सांगणेबाबत बंधपत्र करुन घेणेस.

**विषय क्रं. १५६**

मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाकडील सेवकांची रजा मान्य करणेबाबत मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांचे क्र. मुलेप/४३ दि. २३/४/२००७ चे पत्र.

## सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स

**विषय क्रं. १५७**

हडपसर येरवडा व भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्त्यावरील पावसाळी लाईन साफसफाई करणे व इतर तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडसपैकी ठेकेदार श्री. यादव कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४९,१८,८४०/- पेक्षा ४०.५०% कमी) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २९,२६,७०९.८०/- पर्यंत काम करुन घेण्यास व बाजारभावातील भाववाढ सुत्रानुसार होणारा फरक अदा करणेस / कपात करणेस तसेच त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/६५ दि. २६/४/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १५८**

ब्ल्यु नाईल चौक, कॉन्सिल हॉल,रेसिडेन्सी क्लब चौक विकसनाकरिता मास्टिक अस्फाल्टिंग करणे कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार संजय भिमाशंकर सुनाट यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २९,५५,०९९.५०/- पेक्षा५% जास्त)असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३१,०२,८५४.४७/- पर्यंत काम करुन घेण्यास व अधिक डांबर, सिमेंट, स्टील यांचे बाजारभावातील फरक (वाढ/कपात) अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि)यांचे क्र.मआ/पथ/६६ दि. २६/४/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १५९**

कसबापेठ क्षेत्रिय कार्यालयाच्या अखत्यारीतील पावसाळी ड्रेनेज लाईनचे मॅनहोल्स चेंबर्स साफसफाई करणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडसपैकी ठेकेदार नम्रता कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २९,९६,६८०/- पेक्षा ३०.१% कमी)असल्याने त्यांचेकडून र.रुपये २०,९४,६७९.३२/- पर्यंत काम करुन घेण्यासाठी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि)यांचे क्र.मआ/पथ/६७ दि. २६/४/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १६०**

येरवडा (विमाननगर) येथील लुंकड कॉलनेट सोसायटी जवळ म्हाडा कॉलनीकडे जाणाऱ्या रस्त्यावर आर.सी.सी. पावसाळी गटर करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे. कल्याणी कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २५,८८,०२३/- पेक्षा ७.२०% जास्त)असल्याने त्यांचेकडून र.रुपये २७,७४,३६०.६६/- पर्यंत काम करुन घेण्यास तसेच बाजारभावातील डांबर, सिमेंट, स्टील यांच्या दरातील फरक अदा /कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि)यांचे क्र.मआ/पथ/६८ दि. २६/४/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १६१**

पुणे सोलापूर रस्ता ते मुंढवा रेल्वे ओव्हर ब्रीज पर्यंतचा मगरपट्टा रस्ता पुर्नडांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे. प्रविण पाटील यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३,३६,८३,६३५/- पेक्षा ७.२७% जास्त)असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३,६१,३२,४३५.२६/- पर्यंत काम करुन घेण्यास तसेच अधिक डांबर, सिमेंट, स्टील यांचे बाजारभावातील फरक अदा /कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि)यांचे क्र.मआ/पथ/६९ दि. २६/४/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १६२**

जयकर पथ औंध वॉर्ड ऑफिस ते खडकी रेल्वे स्टेशन पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस ओपन स्टॉर्म वॉटर ड्रेन करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडसपैकी ठेकेदार मे. अमर बालाजी कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २३,६५,३२५/- पेक्षा १८.५% कमी)असल्याने त्यांचेकडून र.रुपये १९,२७,७३९=८८/- पर्यंत काम करुन घेण्यास व डांबर/सिमेंट/स्टील या तिन्ही मटेरियलचे निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधी मध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून येणारी देय भाववाढ देणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि)यांचे क्र.मआ/पथ/७० दि. २६/४/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १६३**

पथ विभागासाठी ॲन्टी स्ट्रिपींग एजंट युवा-बीई -१०० पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे. सुमार्क एजन्सी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (ए-१ पध्दतीचे टेंडर ) (प्रती मे. टन ४,९४,०००/-)असल्याने त्यांचेकडून र.रुपये ४९,४०,०००=००/- पर्यंत काम करुन घेण्यास तसेच अधिक डांबर, सिमेंट, स्टील या तिन्ही मटेरियलचे भाववाढ सुत्रानुसार येणाऱ्या रकमेसह काम करुन घेण्यास व त्यांचे बरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि)यांचे क्र.मआ/पथ/७१ दि. २६/४/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १६४**

बी. टी. कवडे पथाचे खडीकरण करुन डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे. मिश्रा असोसिएटस् यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३,०१,६५,०९५/- पेक्षा ९.५०% जास्त)(तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३,३०,३०,७७९.०२/- पर्यंत काम करुन घेण्यास तसेच अधिक डांबर, सिमेंट, स्टील यांचे बाजारभावातील फरक अदा/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि)यांचे क्र.मआ/पथ/७२ दि. २६/४/२००७ चे पत्र.

## मागिल सभेचे विषय

**विषय क्र. १६५**

श्री.रामदास शं.जगताप, नगरसचिव, नगरसचिव कार्यालय यांचेविरुध्द खातेनिहाय चौकशी प्रकरणी ठेवलेला आरोप सिध्द होत असल्याने व श्री.जगताप हे दि. ३१/१०/२००५ रोजी वयोपरत्वे सेवानिवृत्त झाले असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम क्र. २७ पोटनियम (१) मध्ये नमूद केलेल्या शास्ती बाबतच्या तरतूदीस अनुसरुन श्री.रामदास जगताप, सेवानिवृत्त नगरसचिव यांना देण्यात येत असलेल्या दरमहाच्या मूळ सेवानिवृत्ती वेतनाच्या १५% (पंधरा टक्के) इतक्या रकमेचे महिने महाचे सेवा निवृत्ती वेतन तीन वर्षाच्या कालावधीसाठी राखून ठेवण्याच्या शिक्षेचे आदेश निर्देशित करीत असल्याने त्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. सहमआ/खाचौवि/८६२ दि. २/११/२००६ चे पत्र.

(टिप :- सदर विषयाचा विचार १५दिवसांनी करावा असे दि. १७/४/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं.१६६**

पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागाकरीता २ नग टेंडम व्हायब्रेटरी रोलर मॉडेल एच.ए.एम.एम.एच.डी.-८५ खरेदी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.एस्कॉर्ट कन्स्ट्रक्शन इक्विपमेंट लि.,फरिदाबाद यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून २ नग टेंडम व्हायब्रेटरी रोलर मॉडेल एच.ए.एम.एम.एच.डी.-८५ प्रति नग रु. २२,०६,७८४/- पर्यंत त्यांचे दरपत्रकातील सर्व अटी स्विकारुन होणाऱ्या एकूण र.रुपये ४४,१३,५६८/- पर्यंत खरेदीपोटी होणाऱ्या

रकमेपर्यंत त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/व्हे.डेपो/३१ दि. १३/४/२००७ चे पत्र.
(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

**विषय क्रं.१६७**

गोळवलकर गुरुजी रस्ता विकसन करणे, गोळवलकर गुरुजी रस्त्यावर इंटरलॉकींग ब्लॉक्सचा फुटपाथ करणे व पावसाळी लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.संदिप असोसिएटस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २,२२,५०,६४०/- पेक्षा १५% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २,५५,८८,२३६/- पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालवधीमध्ये वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/३८ दि. १६/४/२००७ चे पत्र.
(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १६८**

मा.विजय देशमुख व मा.प्रमोद भानगिरे यांचे दि. २२/३/२००७ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. २०१७ दि. २७/२/२००७ चा फेरविचार करावा. (पुणे मनपा कामकाजासाठी टुरिस्ट परवाना असलेली वाहने घेणेबाबत)
(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १६९**

पुणे महानगरपालिका व 'यशदा', पुणे या संस्थेच्या संयुक्त सहकार्याने स्वयंसहाय्यता गटाने उत्पादित केलेल्या वस्तूच्या विक्रीसाठी लॅब सुरु करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नावियो/३७ दि. १३/४/२००७ चे पत्र.

१) सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत स्थापन करणेत आलेल्या दारिद्रय रेषेखालील स्वयंसहाय्यता बचत गट आणि इतर बचतगटांसाठी यशदाच्या सहकार्याने संयुक्तरित्या विक्री लॅब सुरु करणेस

२) सदर विक्री लॅबसाठी सन २००६-०७ मधील रक्कम रुपये पन्नास लाखाची तरतूद या प्रकल्पासाठी खर्ची करणेस व सदर रकमेचा धनादेश यशदा, पुणे यांना अदा करणेस

३) सदर विक्री लॅबसाठी यशदा बरोबर एम.ओ.यू. (चशोीरपर्वीा`ष णपवशीीींरपवळपस) निश्चित करणेस व त्यावर स्वाक्षरी करणेचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना तथा ते प्राधिकृत करतील त्या अधिकाऱ्यांना प्रदान करणेस

४) विक्री लॅबला मिळणाऱ्या प्रतिसादानुसार एम.ओ.यू.मध्ये बदल करणेचा अधिकार मा.महापालिका आयुक्त तथा ते प्राधिकृत करतील त्या अधिकाऱ्यास प्रदान करणेस
(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र.१७०**

पुणे महानगरपालिकेच्या देवाची उरुळी येथील कचरा डेपो येथील कचऱ्याचे ढिग पसरवून सपाटीकरणाचे काम करणेसाठी लागणारा चेन बुलडोझर डि ८० - २२० एच पी - ब्लेड १३.५ फुट मशिन मे. नॅशनल अर्थमुव्हर्स यांच्या कडून दर रु. ८०४=४६ प्रति तास, प्रति नग या दराप्रमाणे आवश्यकतेनुसार ३७२९ तास वाढीव रक्कम रुपये २९,९९,८३१.३४ पर्यंत भाडेतत्वावर घेऊन करुन घेणेपोटी त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(तां.)/५४ दि. २०/४/२००७ चे पत्र.

**विषय क्र.१७१**

मागासवर्गीय कल्याणकारी योजना व युवक कल्याणकारी योजना निधी अंतर्गत झोपडपट्टीतील राहणाऱ्या कुटुंबातील कर्त्या पुरुषाचा अपघात झाल्यास अर्थसहाय्य देणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नावियो/५८ दि. २१/४/२००७ चे पत्र.

१) सन २००७ - २००८ चे अंदाजपत्रकात झोपडपट्टी मागासवर्गीय नागरिकांसाठी व सर्वसाधारण नागरिकांसाठी अपघात विमा सुरु करणेसाठी असलेली तरतुद अनुक्रमे रु. पंच्याहत्तर लाख व रु. पंचवीस लाख ही तरतूद झोपडपट्टीतील कुटुंबातील कर्त्या पुरुषांचा / स्त्रियांचा अपघात झाल्यास व पंधरा दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी दवाखान्यात दाखल झाल्यास औषधोपचारासाठी जास्तीत जास्त रु. ५०००/- अर्थसहाय्य देणेसाठी खर्च करणेस,

२) सदर योजनेचे अंमलबजावणीसाठी आवश्यक ते अटी व नियम तयार करणेचा व योजनेला मिळणाऱ्या प्रतिसादावरुन योजनेत बदल करणेचा अधिकार मा. महापालिका आयुक्त अथवा ते प्राधिकृत करतील त्या अधिकाऱ्यास देणेस.

**विषय क्र.१७२**

पुणे मनपा निधीमध्ये उपलब्ध असलेल्या रक्कमेची राष्ट्रीयकृत बँकेमध्ये गुंतवणूक करणेबाबत दरपत्रके मागविली असता आलेल्या १८ बँकापैकी खाली नमूद केलेल्या चार बँकाचे व्याजदर द.सा.द.शे. १०.५०% इतर बँकेपेक्षा जास्त असल्याने रक्कम रुपये १०० कोटी १ वर्ष मुदतीसाठी १) बँक ऑफ महाराष्ट्र, बाजीराव रोड २) ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स, कॅम्प ३) विजया बँक, सदाशिव पेठ ४) एच.डी.एफ.सी. शिवाजीनगर येथे सम प्रमाणात गुंतवणूक करण्यास अथवा प्रत्यक्ष गुंतवणूक होईपर्यंत वरील बँका अथवा इतर राष्ट्रीयकृत बँका यांनी १०.५०% पेक्षा अधिक व्याजदर दिल्यास सदरच्या बँकेत गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/मुले/६० दि.२३/४/२००७ चे पत्र.

**विषय क्र.१७३**

पुणे महानगरपालिकेची सन २००७ मध्ये सार्वत्रिक निवडणूक झाली असून नविन निवडून आलेल्या मा. सभासदांसाठी (म.न.पा. मुख्य सभेसाठी) व इतर समित्यांसाठी नविन ''फाईल्स'' घेणे आवश्यक असल्याने कोटेशन मागविले असता आलेल्या तीन कोटेशन पैकी मे. पूर्वा ट्रेडिंग कंपनी पुणे यांचे दर सर्वात कमी असल्याने त्यांचेकडून एकुण ३५०/- नग फाईल्स खरेदी करण्यात आलेल्या असून मे. पूर्वा ट्रेडिंग कंपनी पुणे २० यांचे र.रु. २५,५९३=७५ चे बिल अदा करण्यास तसेच सदरचा खर्च खालील अर्थशिर्षकावर खर्च करण्यास पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ६७४ दि. २५/४/२००७ चे पत्र.

१.मुख्य देखरेख, वसुली वगैरे, क.मनपा नि स्थायी समिती, १- नगरसचिव यांचे कार्यालय (३) संकिर्ण, सन २००७-०८ मान्य तरतूद र.रुपये १३ लाख.

**विषय क्र.१७४**

पुणे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीपूर्वी बुधवार, दिनांक १४ मार्च २००७ रोजी महापालिकेची शेवटची मुख्य सभा झाली. सदर प्रसंगी मा. महापौर यांनी सर्व मा. नगरसेवक व मनपा अधिकारी अशा एकूण २७५ व्यक्तींची स्नेहभोजनाची व्यवस्था केली होती. सदर स्नेहभोजना प्रित्यर्थ मे. जय केटर्स,१२२, बुधवार पेठ, पुणे २. यांनी रक्कम रुपये ३६,८७०/- (अक्षरी छत्तीस हजार आठशे सत्तर फक्त) रकमेचे बिल सादर केले असून सदरचे बिल खालील अर्थशिर्षकावर खर्ची टाकून संबंधितांस अदा करण्यास मान्यता देणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ६७९ दि. २६/४/२००७ चे पत्र.

सन २००७-२००८ चे विशेष अंदाजपत्रक (दि. १ एप्रिल २००७ ते ३१ जुलै २००७ अखेर)

१.मुख्य देखरेख, वसुली वगैरे, क.मनपा नि स्थायी समिती, १- नगरसचिव यांचे कार्यालय

३अ मागील बिले देण्यासाठी तरतूद र.रुपये १,६६,६६७/-

**विषय क्र.१७५**

पुणे शहराचा सन १९८७ चा मान्यता प्राप्त विकास आराखडा तसेच नव्याने समाविष्ट २३ गावांसाठीचा प्रादेशिक विकास आराखड्याची अंमलबजावणीच्या कामासाठी सर्व्हेअरची अत्यंत आवश्यकता असल्याने खालील निवड यादी व प्रतिक्षा यादीमध्ये नमूद केलेल्या उमेदवारांची मुंबई प्रांतिक म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये नेमणूक करार तत्वावर ६ महिन्यांसाठी करणेस व सदर सर्व्हेअर यांना मुशाहिरा म्हणून एकवट रक्कम दरमहा रु. ५०००/- देणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नअ/७४ दि. २७/४/२००७ चे पत्र.

निवडयादी

१) श्री. पी.वाय. देशपांडे
२) श्री. पी.ई. सोनसळे
३) श्री. मा.छ. कुंकुलोळ
४) श्री. एकनाथ विठ्ठल गंगावणे
५) श्री. के.एम. शिंदे
६) पी.एस. लंकेश्वर

प्रतिक्षा यादी

१) श्री. रा.ना. नानगुडे
२) श्री. ए.एस. गायकवाड
३) श्री. दिगंबर पंडित
४) श्री. सुरेश अत्रे

**शरद समेळ**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

पुणे महानगरपालिका

**✻ स्थायी समिती ✻**

कार्यपत्रिका क्रमांक ६

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ८/५/२००७** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.ज्योतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. १७८**

मा.दिपक गावडे व मा.महादेव बाबर यांचे दि. ३०/४/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ११४ मधील जनता वसाहत शंकर मंदिरजवळील मोडकळीस आलेला पत्र्याचा पाय पूल (फूट ब्रिज) काढून नविन पायपूल (फूट ब्रिज) तयार करणेकरीता र.रुपये १० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, पथ विभागाकडील कामाच्या याद्या, टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय, यादी क्र. ए-१, नविन पथांची सुधारणा करणे, पान क्र. १०३, अ.क्र. ५०, प्रभाग क्र. ३८ सिंहगड रस्त्यावरुन जनता वसाहतीकडे जाण्यासाठी रस्ता विकसित करणे व कॅनॉलवर पूल बांधणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>जनता वसाहत शंकर मंदिरजवळील मोडकळीस आलेला पत्र्याचा पाय पूल (फूट ब्रिज) काढून नविन पायपूल (फूट ब्रिज) तयार करणे | --- | १० लाख |

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्रं. १७९**

दि. १६/४/२००७ ते दि. २२/४/२००७ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ३४ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/७५ दि. २७/४/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**हिशोब तपासणी अहवाल**

**विषय क्रं. १८०**

नगर अभियंता (बांधकाम नियंत्रण विभाग) कार्यालयाकडील कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपांबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं. मुलेप/६६४ दि. २८/५/२००४ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ७५ सन २००३-२००४ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्रं. मआ/मुले/८४ दि. ३०/४/२००७ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता - (ब).

## सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स

**विषय क्रं. १८१**

बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालयाचे हद्दीतील प्रमुख चौकात मास्टीक अस्फाल्ट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार नंदकुमार कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २७,९०,०००/- पेक्षा ॲटपार) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २७,९०,०००/- पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालवधीमध्ये वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/७६ दि. २७/४/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १८२**

विठ्ठलवाडी ते बायपास हायवे या नदीकडेच्या प्रस्तावित २४ मी.रुंदीच्या रस्त्यावर स.नं. १८ वडगांव बु. येथे १२ मी.रुंदीचे नाला कल्व्हर्ट बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.डब्ल्यू.एस.कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १,२०,६७,४७९=५० पेक्षा २४.७५% जास्त) (तडजोडीने) (२९.५% जास्त टेंडर दर) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १,५०,५४,१८०=६७ पर्यंत अधिक टेंडरमधील भाववाढ सुत्रानूसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/७७ दि. ३०/४/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १८३**

पुणे महानगरपालिकेकरीता ६ एमबीपीएस (चर्लीि) १:१ इंटरनेट लीजलाईन घेणे व त्याची देखभाल दुरुस्ती करणेसाठी योग्य संस्थेची निवड करणेसाठी टेंडर्स मागविली असता आलेल्या तीन टेंडर्सपैकी भारती एअरटेक लिमिटेड यांची निविदा सर्वात कमी रकमेची असल्याने त्यांचेकडून काम करुन घेण्यासाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. अतिमआ(ज)/मुले/८३ दि. ३०/४/२००७ चे पत्र.

१) भारती एअरटेक लि. यांनी ६ एमबीपीएस (चर्लीि) १:१ इंटरनेट लीजलाईन टाकून त्यांची देखभाल व दुरुस्ती, नेटवर्क व व्यवस्थापन सुरु करुन देणेकरीता रक्कम रु. प्रति महा १,४७,६६८/- + ५०,५००/- एक वेळ जोडणी रक्कम + सर्व्हिस टॅक्स अदा करणेस

२) भारती एअरटेक लि. यांचेशी निविदा अटी व शर्तीस बांधील राहून करारनामा करणेस

३) सदरचा खर्च खालील अर्थशिर्षकावर टाकणेस

आरई११सी१२४, १९. अहमदाबाद मनपाच्या धर्तीवर ई-गव्हर्नन्स करणे.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. १८४**

मा.उज्वल केसकर व मा.गणेश बिडकर यांचे दि. ४/४/२००७ चे पत्र.

पुणे महानगरपालिका दि. ४/४/०५ च्या मा.आयुक्त यांच्या ४/४/०५ क्र. मआ/टीजीओ/२० व मआ/टीजीओ/९६ अ दि. २१/४/०५ या परिपत्रकाच्या आधाराने करआकारणी करीत आहे. ही आकारणी पुणेकरांना जाचक आहे. तरी या दोन्ही परिपत्रकाच्या आधाराने होत असलेली ’करआकारणी’ (रेडिरेकनरनुसार) रद्द करावी आणि बी.पी.एम.सी.ॲक्ट १९४९ अन्वये कर आकारणी करावी.

(टिप :- सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. २४/४/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. १८५**

पुणे सोलापूर रस्ता ते मुंढवा रेल्वे ओव्हर ब्रीज पर्यंतचा मगरपट्टा रस्ता पुर्नडांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे. प्रविण पाटील यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३,३६,८३,६३५/- पेक्षा ७.२७% जास्त)असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३,६१,३२,४३५.२६/- पर्यंत काम करुन घेण्यास तसेच अधिक डांबर, सिमेंट, स्टील यांचे बाजारभावातील फरक अदा /कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि)यांचे क्र.मआ/पथ/६९ दि. २६/४/२००७ चे पत्र.
(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. १८६**

जयकर पथ औंध वॉर्ड ऑफिस ते खडकी रेल्वे स्टेशन पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस ओपन स्टॉर्म वॉटर ड्रेन करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडसपैकी ठेकेदार मे. अमर बालाजी कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २३,६५,३२५/- पेक्षा १८.५% कमी)असल्याने त्यांचेकडून र.रुपये १९,२७,७३९=८८/- पर्यंत काम करुन घेण्यास व डांबर/सिमेंट/स्टील या तिन्ही मटेरियलचे निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधी मध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून येणारी देय भाववाढ देणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि)यांचे क्र.मआ/पथ/७० दि. २६/४/२००७ चे पत्र.
(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. १८७**

पथ विभागासाठी ॲन्टी स्ट्रिपींग एजंट युवा-बीई -१०० पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे. सुमार्क एजन्सी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (ए-१ पध्दतीचे टेंडर ) (प्रती मे. टन ४,९४,०००/-)असल्याने त्यांचेकडून र.रुपये ४९,४०,०००=००/- पर्यंत काम करुन घेण्यास तसेच अधिक डांबर, सिमेंट, स्टील या तिन्ही मटेरियलचे भाववाढ सुत्रानुसार येणाऱ्या रकमेसह काम करुन घेण्यास व त्यांचे बरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि)यांचे क्र.मआ/पथ/७१ दि. २६/४/२००७ चे पत्र.
(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. १८८**

बी. टी. कवडे पथाचे खडीकरण करुन डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे. मिश्रा असोसिएटस् यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३,०१,६५,०९५/- पेक्षा ९.५०% जास्त)(तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३,३०,३०,७७९.०२/- पर्यंत काम करुन घेण्यास तसेच अधिक डांबर, सिमेंट, स्टील यांचे बाजारभावातील फरक अदा/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि)यांचे क्र.मआ/पथ/७२ दि. २६/४/२००७ चे पत्र.
(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. १८९**

पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागाकरीता २ नग टेंडम व्हायब्रेटरी रोलर मॉडेल एच.ए.एम.एम.एच.डी.-८५ खरेदी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.एस्कॉर्ट कन्स्ट्रक्शन इक्विपमेंट लि.,फरिदाबाद यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून २ नग टेंडम व्हायब्रेटरी रोलर मॉडेल एच.ए.एम.एम.एच.डी.-८५ प्रति नग रु. २२,०६,७८४/- पर्यंत त्यांचे दरपत्रकातील सर्व अटी स्विकारुन होणाऱ्या एकूण र.रुपये ४४,१३,५६८/- पर्यंत खरेदीपोटी होणाऱ्या रकमेपर्यंत त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/व्हे.डेपो/३१ दि. १३/४/२००७ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. १९०**

गोळवलकर गुरुजी रस्ता विकसन करणे, गोळवलकर गुरुजी रस्त्यावर इंटरलॉकींग ब्लॉक्सचा फुटपाथ करणे व पावसाळी लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.संदिप असोसिएटस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २,२२,५०,६४०/- पेक्षा १५% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २,५५,८८,२३६/- पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालवधीमध्ये वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/३८ दि. १६/४/२००७ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १९१**

पुणे महानगरपालिका व 'यशदा', पुणे या संस्थेच्या संयुक्त सहकार्याने स्वयंसहाय्यता गटाने उत्पादित केलेल्या वस्तूच्या विक्रीसाठी लॅब सुरु करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नावियो/३७ दि. १३/४/२००७ चे पत्र.

१) सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत स्थापन करणेत आलेल्या दारिद्रय रेषेखालील स्वयंसहाय्यता बचत गट आणि इतर बचतगटांसाठी यशदाच्या सहकार्याने संयुक्तरित्या विक्री लॅब सुरु करणेस

२) सदर विक्री लॅबसाठी सन २००६-०७ मधील रक्कम रुपये पन्नास लाखाची तरतूद या प्रकल्पासाठी खर्ची करणेस व सदर रकमेचा धनादेश यशदा, पुणे यांना अदा करणेस

३) सदर विक्री लॅबसाठी यशदा बरोबर एम.ओ.यू. (चशौीरपवीीं ष णपवशीीींरपवळपस) निश्चित करणेस व त्यावर स्वाक्षरी करणेचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना तथा ते प्राधिकृत करतील त्या अधिकाऱ्यांना प्रदान करणेस

४) विक्री लॅबला मिळणाऱ्या प्रतिसादानुसार एम.ओ.यू.मध्ये बदल करणेचा अधिकार मा.महापालिका आयुक्त तथा ते प्राधिकृत करतील त्या अधिकाऱ्यास प्रदान करणेस

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्रं. १९२**

पुणे पेठ सदाशिव सि.स.नं. २१६९ फा.प्लॉट नं. ४० ब कै.बाबुराव सणस मैदान देखभाल दुरुस्ती व संयुक्तपणे प्रकल्प राबविणेबाबत तत्वत: निर्णय झालेला असून त्या अनुषंगाने पुणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स संघटना व पुणे मनपा यांनी संयुक्तपणे प्रकल्प राबवून मा.महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रासोबत जोडलेल्या प्रारुप करारनाम्यातील अटी/शर्तीच्या अधीन राहून केवळ देखभाल व दुरुस्तीसाठी सदर संघटनेस दीर्घ मुदतीचे (११ वर्षे) देणेसाठी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भूसं/७८ दि. ३०/४/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १९३**

पुणे महानगरपालिका आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने दि. २३/४/२००७ ते २/५/२००७ (बुध्द जयंती) या कालावधीत पुणे शहरातील ऐतिहासिक शनिवारवाड्यासमोर भीम फेस्टिव्हल सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून सदरच्या कार्यक्रमाचे सह प्रायोजकत्व स्विकारुन र.रुपये ५ लाखाची आर्थिक मदत करणेस तसेच मा.महापालिका आयुक्त यांना वर्गीकरणाने रक्कम रुपये ५ लाख उपलब्ध करुन देण्यास अधिकार देणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/मुले/७९ दि. ३०/४/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १९४**

सन २००७-२००८ सालासाठी आयातकराचे दर चालू ठेवणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/ओ/तप/८० दि. ३०/४/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १९५**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षाकरीता करमणूक कर व मिळकतकर दर निश्चित करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/वसुली/८१ दि. ३०/४/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १९६**

सन २००७-२००८ पाणीपट्टीच्या विविध दरांमध्ये व शुल्कांमध्ये करावयाचे बदलाबाबतचे मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/पापु/८२ दि. ३०/४/२००७ चे पत्र.

**शरद समेळ**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

पुणे महानगरपालिका

**✻ स्थायी समिती ✻**

कार्यपत्रिका क्रमांक ७

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १५/५/२००७** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.ज्योतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. १९८**

मा.किरण बारटक्के यांचे दि. ३/५/२००७ चे पत्र.

वारजे पॉप्यूलरनगर वॉर्ड क्र. ११० येथील लहान मुलांसाठी कोणत्याही प्रकारचे खेळाचे मैदान नाही. त्यामुळे त्यांच्या खेळावर अनेकवेळा गदा येत आहे. तरी वारजे स.नं. ७८ ही जागा खेळाचे मैदानासाठी आरक्षित असून सदरची जागा ताब्यात घेऊन त्याठिकाणी खेळाचे मैदान विकसित करण्यात यावे. त्यासाठी सन २००७-०८ च्या अंदाजपत्रकामध्ये तरतूद करण्यात यावी.

**विषय क्र. १९९**

मा.किरण बारटक्के यांचे दि. ३/५/२००७ चे पत्र.

वारजे पॉप्यूलरनगर वॉर्ड क्र. ११० हा दाट वस्तीचा भाग असून तेथील नागरीकांना दवाखान्याची अत्यंत गरज आहे. या भागामध्ये मनपाची कोणतीही वैद्यकिय सेवा उपलब्ध नाही तसेच वारजे स.नं. ४५ व स.नं. १३२ ही जागा हॉस्पिटल व दवाखाना यासाठी आरक्षित असून सदरची जागा ताब्यात घेऊन त्याठिकाणी मनपाचे हॉस्पिटल व दवाखाना बांधण्यात यावे. त्यासाठी सन २००७-०८ च्या अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी.

**विषय क्र. २००**

मा.रविंद्र धंगेकर व मा.ॲड्.किशोर शिंदे यांचे दि. ५/५/२००७ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व धार्मिक मिळकतींची ज्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नाहीत तसेच निवासी किंवा बिगर निवासीसुध्दा वापर होत नाही अशा धार्मिक स्थळांना (मिळकतींना) संपूर्ण पाणीपट्टी माफ करण्यात यावी.

**विषय क्र. २०१**

मा.शंकर पवार व मा.राजेंद्र गोरडे यांचे दि. ७/५/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. १०४ पू.ल.देशपांडे उद्यान येथे फरशी व कॉंक्रीटीकरण करणेसाठी र.रुपये ३ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, अ व क मधील क्षेत्रिय कार्यालये, भांडवली निधीतून करावयाची कामे, विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय, पान क्र. २७, वॉर्ड क्र. १०४ नाल्याची साफसफाई करणे व तदनुषंगिक कामे करणे | ३ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. १०४ पू.ल.देशपांडे उद्यान येथे फरशी व कॉंक्रीटीकरण करणे | --- | ३ लाख |

**विषय क्र. २०२**

मा.सौ.मंगला मंत्री व मा.सौ.पार्वती भडके यांचे दि. ७/५/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ४५ विकासनगर-घोरपडी भागातील स.नं. ७० मधून स.नं. ६७ अ, रेल्वेच्या कडेने जाणाऱ्या डी.पी.रोडची जागा संपादन करण्यात यावी. सदर रोडची ७० टक्के जागा संपादीत झालेली आहे. उर्वरित जागा संपादित केल्याने नागरीकांची गैरसोय दूर होईल.

**विषय क्र. २०३**

मा.सौ.रजनी त्रिभुवन व मा.ॲड्.अविनाश साळवे यांचे दि. ७/५/२००७ चे पत्र.

ताडीवाला रोड झोपडपट्टीकडे जाणारा २० फूटी टी.पी.स्किममधील रस्ता पुढे मोठा आहे व मागे ही मोठा आहे. यामुळे याठिकाणी बॉटलनेक झाला आहे व त्या रस्त्यावरील रहदारी खुपच वाढल्याने वारंवार तेथे रहदारीचा खोळंबा होत आहे. म्हणून हा रस्ता वरील ठिकाणी मिळकतीमध्ये पश्चित बाजूस कलम २१० अन्वये ५ फूट वाढवून ३० फूट करण्यात यावा. (हॉटेल मेरुच्या बाजूस) तसेच याला छेदणारा फा.प्लॉट नं. १७८, १७९, १८० मधून जाणारा रस्ता ही दक्षिणेकडील बाजूस ५ फूट रुंद करण्यात येवून २५ फूट केल्यास दोन्ही रस्ते कलम २१० अन्वये आखण्यात यावेत.

**विषय क्र. २०४**

मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे व मा.शिवाजी शिंदे यांचे दि. ७/५/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. १६ फुलेनगर या प्रभागातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर हौसिंग सोसायटी व करुणा हौसिंग सोसायटी आणि पुढे अग्रसेन हायस्कूलकडे जाणाऱ्या त्रिकोनी चौकात वारंवार लहान मोठे अपघात होत असतात त्याकरीता हा त्रिकोणी चौक, रस्ता दुतर्फा चौक मोठा करण्यात यावा.

**विषय क्र. २०५**

मा.वसंत मोरे यांचे दि. ८/५/२००७ चे पत्र.

दि. ११ सप्टेंबर १९९७ रोजी पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत वाढ होऊन त्यात ३८ गावांचा समावेश करण्यात आला आहे. त्यापैकी कात्रज, धनकवडी, आंबेगाव, कोंढवा ह्या गावांना मनपाने सन २००७ साली पाणी दिले परंतू १९९७ सालापासून त्या नागरीकांकडून पाणीपट्टी घेतली आहे.
मा.मुख्य सभेच्या ठरावाप्रमाणे ज्याठिकाणी पाणी पुरवठ्याचे काम नाही, त्या नागरीकांकडून पाणीपट्टी वसूल करु नये असे असताना या गावांकडून पाणीपट्टी वसूल केली आहे. तरी या गावातील नागरिकांकडून वसूल केलेली पाणीपट्टी त्यांच्या पुढील टॅक्समध्ये समयोचित करुन त्यांना बिले द्यावी.

**विषय क्र. २०६**

मा.अभिजित शिवरकर, मा.सौ.मंगला मंत्री व मा.नितीन जगताप यांचे दि. ९/५/२००७ चे पत्र.

पुणे मनपाच्या हद्दीतील नागरिकांना ज्या दराने पाणी पुरवठा होतो, त्याच दराने पुणे व खडकी कॅन्टोन्मेंट हद्दीतील नागरीकांना पाणी पुरवठा करावा.

सध्या पुणे मनपा हद्दीत एक हजार लिटरला ३ रुपये या दराने पाणीपट्टी आकारली जाते. तर कॅन्टोन्मेंट हद्दीत हाच दर एक हजार लिटरला ५ रुपये इतका आहे. त्यातच पुणे मनपा आयुक्तांनी या पाणीपट्टी दरात हद्दीत १५ टक्के तर कॅन्टोन्मेंट हद्दीत २० टक्के दरवाढ सुचविलेली असून ही असमानता आहे. त्यात सुसमता आणण्यात यावी.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्रं. २०७**

दि. २३/४/२००७ ते दि. २९/४/२००७ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ४६ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/९३ दि. ७/५/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्रं. २०८**

शिक्षण मंडळ, पुणे अंतर्गत भरलेल्या विविध पदांबाबत - चौकशी अहवालाची प्रत माहितीसाठी सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/शिमं/९१ दि. ७/५/२००७ चे पत्र.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्रं. २०९**

मा.क्षेत्रिय अधिकारी, कर्वे रोड क्षेत्रिय कार्यालय यांचे नियंत्रणाखालील भवन विभागाकडील सन २०००-०१ या आर्थिक वर्षातील टेंडरद्वारे करुन घेतलेल्या विविध कामाचे उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह बाबींबाबत मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/५९९ दि. ८/५/२००७ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ४६ सन २००६-२००७ चा विचारासाठी.

**विषय क्रं. २१०**

मा.महा.सहा.आयुक्त वि.क्र. १ यांचे नियंत्रणाखालील औंध क्षेत्रिय कार्यालयाकडील सन २०००-०१ या आर्थिक वर्षातील केलेल्या जलोत्सारण व गवनि या विभागाकडील काही टेंडर प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह बाबींबाबत मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/६०० दि. ८/५/२००७ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ४७ सन २००६-२००७ चा विचारासाठी.

**विषय क्रं. २११**

मा.क्षेत्रिय अधिकारी, कर्वे रोड क्षेत्रिय कार्यालय यांचे नियंत्रणाखालील भवन विभागाकडील सन २००२-०३ या आर्थिक वर्षातील टेंडरद्वारे करुन घेतलेल्या विविध कामांचे उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह बाबींबाबत मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/६०१ दि. ८/५/२००७ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ४८ सन २००६-२००७ चा विचारासाठी.

**विषय क्रं. २१२**

मा.महा.सहा.आयुक्त वि.क्र. १ यांचे नियंत्रणाखालील औंध क्षेत्रिय कार्यालयाकडील सन २०००-०१ या आर्थिक वर्षातील केलेल्या पथ विभागाकडील काही टेंडर प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह बाबींबाबत मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/६०२ दि. ८/५/२००७ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ४९ सन २००६-२००७ चा विचारासाठी.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्रं. २१३**

मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाकडील सेवकांची रजा मान्य करणेबाबत मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांचे क्र. मुलेप/५३ दि. ५/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २१४**

आयातकर कार्यालयाकडील ज्यु.ग्रेड लेखनिक श्री.संदीप वसंत चव्हाण यांचे निलंबनास दि. २४/४/२००७ रोजी दुसरी सहामाही पूर्ण झाली असल्याने मनपा सेवानियम ५८ नुसार सदरची बाब निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/सेवकवर्ग/९० दि. ७/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २१५**

मनपाच्या विविध विभागाकडे कनिष्ठ अभियंता(विद्युत) या पदावर नव्याने ६ महिने मुदतीकरीता करार पध्दतीने नेमणूक करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/सहमआ/से/१०३ दि. ८/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २१६**

नगरसचिव कार्यालयाकडील सेवकांची रजा मान्य करणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ९८८ दि. १०/५/२००७ चे पत्र.

**सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स**

**विषय क्रं. २१७**

आशिष गार्डन ते पौड रस्ता दरम्यानचा रस्ता सेन्सर पेव्हर फिनिशरने डांबरी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार प्रविण पाटील यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३६,२०,०५१/- पेक्षा ९.७७% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३९,७३,७२९=९८ पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालवधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/९५ दि. ७/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २१८**

वारजे कर्वेनगर व कर्वेरोड क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यकक्षेतील रस्त्यावरील पावसाळी लाईन साफसफाई करणे व इतर तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.नम्रता कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २९,९३,९२०/- पेक्षा १९% कमी) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २४,२५,०७५=२० पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/९६ दि. ७/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २१९**

पुणे मनपाच्या प्रभाग क्र. ४३ मधील ई ग्रंथालयासाठी संगणक व साहित्य खरेदी करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी टेंडरदार मे.प्रिया टेक सोल्युशन प्रा.लि., पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून टेंडर स्पेसिफिकेशनप्रमाणे संगणक व साहित्य मा.महा.आयुक्त यांचे पत्रातील अ.क्र. १ ते ९ करीता एकूण र.रुपये १९,३४,९८४/- सर्व करासह पर्यंत खरेदी करणे व खरेदीपोटी त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उआ(तां)/९७ दि. ७/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २२०**

प्रभाग क्र. २१ कोथरुड आशिष गार्डन ते एकलव्य कॉलेज फुटपाथ करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडसपैकी तृतीय क्रमांकाचे ठेकेदार मे.बालाजी पुजा कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,९९,९१८=५० पेक्षा २६.५१% कमी) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १४,६९,७४०=११ पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालवधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून येणारी देय भाववाढ देणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/९८ दि. ७/५/२००७ चे पत्र.

(टिप :- प्रथम क्रमांकाचे ठेकेदार मे.पी.जी.डोंगरे यांनी कामाची वर्कऑर्डर दिल्यानंतर काम करण्यास असमर्थता दर्शविल्याने व द्वितीय क्रमांकाचे ठेकेदार मे.पेडणेकर कुऱ्हाडे हे काम करण्यास तयार नसल्याने तृतीय क्रमांकाचे ठेकेदार मे.बालाजी पुजा कन्स्ट्रक्शन यांची शिफारस करण्यात आली आहे.)

**विषय क्रं. २२१**

सहजानंद सोसायटी ते आशिष गार्डन दरम्यानचा रस्ता सेन्सर पेव्हर फिनिशरने डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.प्रविण पाटील यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १,०९,१४,१७५/- पेक्षा ९.७७% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १,१९,८०,४८९=९० पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालवधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/९९ दि. ७/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २२२**

सहजानंद सोसायटी ते आशिष गार्डन रस्ता सेमीग्राऊट करणे, पावसाळी लाईन टाकणे व इंटरलॉकींग ब्लॉकमध्ये फुटपाथ करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार श्री.के.डी.सोनावणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १,१५,०५,३६०/- पेक्षा १२.६०% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १,२९,५५,०३५=३६ पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालवधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१०० दि. ७/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २२३**

वारजे कर्वेनगर, कर्वेरोड, घोलेरोड व औंध क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यकक्षेतील मुख्य रस्ते सेन्सर पेव्हर फिनिशरने डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मोहनलाल मथरानी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९,५७,२७,९१०/- पेक्षा १७.१% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ११,२०,९७,३८२=६१ पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालवधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१०१ दि. ७/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २२४**

पुणे नगर रस्ता शास्त्रीनगर चौकातील रस्त्याचे काम मास्टीक ॲस्फॉल्ट वापरुन करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार प्रियांका कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४६,८९,५८०/- पेक्षा ०.९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ४६,४७,३७३=७८ पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही आयटेमच्या बेसिक दरामध्ये वाढ/घट झाल्यास त्यांच्या फरकाची रक्कम ठेकेदारास अदा करण्यास व वसुल करण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१०८ दि. ९/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २२५**

मित्रमंडळ चौक ते पूरम चौक दरम्यान रस्ता व फुटपाथ विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.ओम अभिषेक एंटरप्रायजेस यांचे एकच टेंडर (टेंडर र.रु. १९,९७,१९०/- पेक्षा १२% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २२,३६,८५२=८० पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/९४ दि. ७/५/२००७ चे पत्र.

**टेंडर्स न मागविता**

**विषय क्रं. २२६**

पुणे मनपाच्या आरोग्य खात्याकडील कमला नेहरु रुग्णालय व डॉ.नायडू रुग्णालय यांना लागणारे अनुक्रमे ३६००० लिटर्स व १५००० लिटर्स दुध दि. १/४/२००७ ते ३१/३/२००८ या मुदतीसाठी शासकीय दुध योजना, पुणे यांचेकडून शासनाकडे उपलब्ध असलेल्या साठ्यानुसार प्रतिलिटर ठिकाण पोहोच दर गाईचे दुध रु. १६.३० या दरात अगर हायकॉट दुध प्रतिलिटर रु. २३.४० या दराने होणारी रक्कम रु. ११,९३,४००/- (अक्षरी अकरा लाख त्र्यान्नव हजार चारशे फक्त) पर्यंत अगर रुग्णालयातील रुग्णांच्या संख्येत प्रासंगिक वाढ झाल्याने जादा दुध लागल्यास त्याप्रमाणे होणाऱ्या रकमेपर्यंत अगर शासनाकडून वेळोवेळी कमी-जास्त करण्यात येणाऱ्या दुधाच्या दरानुसार येणाऱ्या रकमेपर्यंत मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम शेड्यूल चॅप्टर ५(२)(२) नुसार दुध पुरविण्यासाठी शासकीय दुध योजना, पुणे यांचेकडून करारनामा न करता दुध खरेदी करणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/आरोग्य/८६ दि. ७/५/२००७ चे पत्र.

(टिप :- सदरची खरेदी राज्य शासनाच्या अधिकृत अशा शासकीय दुध योजनेकडून होत असल्याने व यापेक्षा कमी दर येण्याची शक्यता नसल्याने ही खरेदी शासकीय दुध योजना, पुणे (गव्हर्नमेंट मिल्क सप्लाय स्किम) यांचेकडून टेंडर न काढता खरेदी करण्यात येत आहे.)

**मागील सभेचे विषय**

**विषय क्रं. २२७**

पुणे महानगरपालिकेकरीता ६ एमबीपीएस (चलीि) १:१ इंटरनेट लीजलाईन घेणे व त्याची देखभाल दुरुस्ती करणेसाठी योग्य संस्थेची निवड करणेसाठी टेंडर्स मागविली असता आलेल्या तीन टेंडर्सपैकी भारती एअरटेक लिमिटेड यांची निविदा सर्वात कमी रकमेची असल्याने त्यांचेकडून काम करुन घेण्यासाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. अतिमआ(ज)/मुले/८३ दि. ३०/४/२००७ चे पत्र.

१) भारती एअरटेक लि. यांनी ६ एमबीपीएस (चलीि) १:१ इंटरनेट लीजलाईन टाकून त्यांची देखभाल व दुरुस्ती, नेटवर्क व व्यवस्थापन सुरु करुन देणेकरीता रक्कम रु. प्रति महा १,४७,६६८/- + ५०,५००/- एक वेळ जोडणी रक्कम + सर्व्हिस टॅक्स अदा करणेस

२) भारती एअरटेक लि. यांचेशी निविदा अटी व शर्तीस बांधील राहून करारनामा करणेस

३) सदरचा खर्च खालील अर्थशिर्षकावर टाकणेस

आरई११सी१२४, १९. अहमदाबाद मनपाच्या धर्तीवर ई-गव्हर्नन्स करणे.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्रं. २२८**

अंदाजपत्रकामध्ये विविध सार्वजनिक संस्थांचे नांवे मान्य झालेल्या देणगीच्या रकमा अदा करणेबाबत झालेला विधी समिती ठराव क्र.७ दि. ३/५/२००७ विचारासाठी.

**विषय क्रं. २२९**

अंदाजपत्रकामध्ये विविध सार्वजनिक संस्थांचे नांवे मान्य झालेल्या देणगीच्या रकमा अदा करणेबाबत झालेला विधी समिती ठराव क्र.३(१) दि. ३/५/२००७ विचारासाठी.

**विषय क्रं. २३०**

पुणे मनपा हद्दीतील संस्थांना सन २००७-०८ करिता देणगी देणेबाबत झालेला विधी समिती ठराव क्र.३(४) दि. ३/५/२००७ विचारासाठी.

**विषय क्रं. २३१**

नगरसचिव कार्यालयामार्फत दि. १/४/२००७ ते ३१/३/२००८ या मुदतीत विविध सत्कार समारंभ, उदघाटन समारंभासाठी स्मृतिचिन्हे, गौरवपदके, मानपत्र इत्यादी पुरविण्याचे कामाबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ८१२ दि. ४/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २३२**

नगरसचिव कार्यालयामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रम/समारंभ प्रसंगी दि. १/४/२००७ ते ३१/३/२००८ या मुदतीत पुष्पहार, तोरण, फुलांच्या माळा, पुष्पचक्र, शेरे इत्यादी पुरविण्याचे कामाबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ८१३ दि. ४/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २३३**

नगरसचिव कार्यालयामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रम/समारंभ प्रसंगी दि. १/४/२००७ ते ३१/३/२००८ या मुदतीत छायाचित्रे काढण्याचे कामाबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ८१४ दि. ४/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २३४**

पुणे मनपाच्या प्रचलित आयातकर नियमावली नियम ५(९) मध्ये नव्याने समावेश केवळ वृत्तपत्र छपाईसाठी लागणारा (न्यूज प्रिंटींग पेपर) कागद या पुणे शहर जकात सिमेमध्ये मान्यताप्राप्त/नोंदणीकृत वृत्तपत्रांकडे आयात होणाऱ्या मालास आयातकर माफी देणे (नियम ५(९)(टी) मा.महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट अ नुसार) तसेच पुणे मनपा प्रचलित जकात शेड्यूल ओ आयटेम क्र. ८७ मध्ये दुरुस्ती सर्व प्रकारचे कागद (हाताने बनविलेला कागद व त्याचे जिन्नस, न्यूज प्रिंटींग पेपरसोडून) (मा.महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट ब नुसार) अशा प्रकारे नियमामध्ये नविन समावेशस व जकात शेड्यूल ओ आयटेम क्र. ८७ मध्ये दुरुस्ती प्रस्तावास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची अंतिम मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/ओ/तप/१०५ दि. ९/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २३५**

पुणे मनपाच्या हद्दीत माल आयात करणारे रिलायन्स रिटेल लि., वानवडी, पुणे ४११०४० यांनी जकात नियम २५(१) व (२) या तरतुदीन्वये आयातकरांचे त्यांच्या दि. ९/३/२००७ च्या अर्जानुसार आयातकर खात्याकडील चालू खाते (करंट अकौंट) ची सुविधा मान्य करणेस व मा.महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात नमूद केलेल्या अ.क्र. १ ते १८ या अटींचे अधीन राहून योग्य तो कायदेशीर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/आयातकर/१०७ दि. ९/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २३६**

नगर उपअभियंता (पथ ४) यांचे कार्यक्षेत्रातील प्रमुख रस्त्यांचे सेन्सर पेव्हरने डांबरीकरण करणेकामी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/पथ/११२ दि. ९/५/२००७ चे पत्र.

१) यापूर्वी दि. १७/४/२००७ रोजी ठेकेदार मे.श्रीमाऊली इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे मान्य केलेले टेंडर रद्द करुन सदरचा मा.स्थायी समिती ठराव क्र. १०३ दि. १७/४/२००७ अन्वयेचा ठराव निरस्त करणेस

२) विषयांकित कामाचे तृतीय क्रमांकाचे ठेकेदार मे.पाटील कन्स्ट्रक्शन यांचेकडून पूर्वी शिफारस केलेल्या ठेकेदाराच्या (१९.५०% जास्त) टेंडरदरानुसार र.रु. ११,९३,६४,०३८=८० पर्यंतचे काम टेंडरमधील डांबर, सिमेंट आणि स्टील या बाबींच्या भाववाढ सुत्रानुसार येणाऱ्या रक्कमेसह करुन घेण्यास व त्यांचेबरोबर करार करण्यास.

**विषय क्रं. २३७**

पुणे मनपाच्या ५७ व्या वर्धापन दिनानिमित्त देण्यात आलेल्या स्नेहभोजनाचे जय केटरर्स यांचे र.रुपये ५८,२५९/- चे बिल अदा करणेबाबत मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. नसजा/९४० दि. ९/५/२००७ चे पत्र.

**शरद समेळ**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

पुणे महानगरपालिका

**✻ स्थायी समिती (विशेष खास सभा) ✻**

कार्यपत्रिका क्रमांक ८

**स्थायी समितीची विशेष खास सभा शनिवार दि. १९/५/२००७ रोजी सकाळी ११:३० (साडेअकरा) वाजता छ.शिवाजी महाराज सभागृहात (मनपा सभागृहात) भरेल.**

सदर सभेत खालील विषयाचा विचार होईल.

**विषय क्र. २३८**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार करण्यात आलेला पुणे महानगरपालिकेचा सन २००७-२००८ करीताचा महसुली, भांडवली वगैरे जमा खर्चाचा 'अ' व 'क' अंदाजपत्रकाचा आराखडा सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/मुले/१२६ दि. १४/५/२००७ चे पत्र.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

पुणे महानगरपालिका

**✻ स्थायी समिती ✻**

कार्यपत्रिका क्रमांक ९

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २२/५/२००७** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.ज्योतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. २३९**

मा. शांतीलाल मिसाळ व मा. सौ. रेखा शिंदे यांचे दि. ११/५/२००७ चे पत्र.

नुकत्याच झालेल्या पुणे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीत वॉर्ड क्र. ७७ मधून मा. सौ. राजश्रीताई सुर्यकांत आंदेकर या निवडून आल्या आहेत. त्या रहावयास २१ नाना पेठ पुणे २ या ठिकाणी असून त्यांची राहती खोली ही कुटुंबाच्या मानाने अत्यंत अपूरी व गैरसोयीची आहे. वॉर्डमिधील अनेक नागरिक व सामाजिक कार्यकर्ते त्यांच्या अडी अडचणी/तक्रारी सोडविण्यासाठी त्यांचे निवासस्थानी दररोज येत आहेत. तसेच राजकिय क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती निवासस्थानी येतात. अपुऱ्या जागेअभावी खूपच गैरसोय होत आहे. तरी मा. सौ. राजश्रीताई सुर्यकांत आंदेकर यांना ''जनसंपर्क'' कार्यालयासाठी १०५१ भवानी पेठ आंध्रझार आळी, विश्वेश्वर मंदिराशेजारील १५ बाय १५ या मापाची मोकळी जागा दिर्घ मुदतीच्या कराराने भाडेपट्टयाने देण्यात यावी.

**विषय क्र. २४०**

मा. संजय नांदे व मा. शैलेंद्र नलावडे यांचे दि. ११/५/२००७ चे पत्र.

श्री छत्रपती संभाजीनगर मित्र मंडळ हे सामाजिक क्षेत्रात गेली २० वर्षापासून काम करीत आहेत. तसेच सदर मित्र मंडळ रजिस्टर आहे. सदर मंडळास गणपती मंदीर लगतची २४ बाय १९ ची मोकळी जागा सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी दिर्घ कराराने देण्यात यावी.

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. २४१**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २३/१२/२००६ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २१/४/२००७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/५६ दि. ९/५/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्रं. २४२**

दि. ३०/४/२००७ ते दि. ६/५/२००७ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ३१ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/१२४ दि. १४/५/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**हिशोब तपासणी अहवाल**

**विषय क्रं. २४३**

औंध क्षेत्रिय कार्यालयाकडील सन २००१-०२ मधील भवन व विद्युत विभागाकडील टेंडर प्रकरणे व तद्नुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह बाबींबाबत मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/६०३ दि. ९/५/२००७ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ५० सन २००६-२००७ चा विचारासाठी.

**विषय क्रं. २४४**

येरवडा क्षेत्रिय कार्यालयाकडील सन २०००-०१ व २००२ -०३ मधील भवन विभागाकडील टेंडर प्रकरणे व तद्नुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह बाबींबाबत मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/६०४ दि. १४/५/२००७ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ५१ सन २००६-२००७ चा विचारासाठी.

**सेवकवर्गाची प्रकरणे**

**विषय क्रं. २४५**

मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाकडील सेवकांची रजा मान्य करणेबाबत मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांचे क्र. मुलेप/५७ दि. १५/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २४६**

मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाकडील उपमुख्य लेखापरिक्षक, (वेतनश्रेणी रु. १०००० ते २०२५०+ मान्य भत्ते) या हुद्याच्या रिक्त जागेवर श्री. सावंत पांडुरंग गोपाळ, सिनिअर ऑडीटर, यांची बढतीने नेमणूक करण्यासाठी खातेनिहाय बढती समितीने शिफारस केलेल्या निवडसूचीनुसार सध्या उपलब्ध असलेल्या जागेवर मा. मुख्य लेखापरिक्षक यांनी नेमणूक करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) व ५३(२) अन्वये मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांचे क्र. मुलेप/५८ दि. १७/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २४७**

नगरसचिव कार्यालयाकडील सेवकांची रजा मान्य करणेबाबत मा.नगरसचिव यांचे दि. १७/५/२००७ चे पत्र.

**सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स**

**विषय क्रं. २४८**

सिंहगड रस्त्यावर माणिक बाग ते फ्लायओव्हर ब्रिज दरम्यान सेंन्सर पेव्हरने डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे. पाटील कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १,७१,६५,९२५=०० पेक्षा १९.९५% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २,०५,९०,५२७=०३ पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, आणि स्टील भाववाढ सूत्रानुसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यास व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/११५ दि. १४/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २४९**

औंध व घोलेरोड क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील रस्त्यावरील पावसाळी लाईन टाकणे, साफसफाई करणे व इतर तद्नुषंगिक करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे. यादव कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २९,९३,९२०=०० पेक्षा १९.५०% कमी) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २४,१०,१०५=६० पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालवधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/११६ दि. १४/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २५०**

पी. आय. सिटी ते बाह्यवळण महामार्ग हा १५ मी. रुंदीचा डी. पी. रस्ता सेन्सर पेव्हरने डांबरी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे. सनशाईन पेव्हींग्ज प्रा. लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६२,०३,७४५=०० पेक्षा १९.५०% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ७४,१३,४७५=२८ पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलचे भाववाढ सूत्रानुसार येणाऱ्या रकमेसह करुन घेण्यास व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/११७ दि. १४/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २५१**

प्रभाग क्र. १९ मध्ये वडगाव बुद्रुक सर्वे नं. ३५ ते ४९ पर्यंतच्या १८ मी. रस्त्यापैकी ९ मी. रस्ता डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे. सनशाईन पेव्हींग्ज प्रा. लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २४,९७,४२०=०० पेक्षा १९.५०% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २९,८४,४१६=९० पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलचे भाववाढ सूत्रानुसार येणाऱ्या रकमेसह करुन घेण्यास व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति. महा. आयुक्त (वि) यांचे क्र. मआ/पथ/११८,दिनांक १४/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २५२**

प्रभाग क्र. १७, १८, २५ अंतर्गत बिबवेवाडी अप्पर इंदिरानगर शेवटचा बसस्टॉप ते व्ही. आय. टी. रस्ता विकसन करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे. हेमंत कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,९९,७६६/- पेक्षा २०% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १,१९,९९,७१९ = २० पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालवधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/११९ दि. १४/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २५३**

प्रभाग क्र. ३५ डायस प्लॉट येथील कॅनालवरील कलव्हर्टचे रुंदीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार नोबेल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ७१,६८,७१०/-पेक्षा २३.९९% जास्त)असल्याने त्यांचेकडून र.रुपये ८८,८८,४८३ =५३ पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालवधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१२० दि. १४/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २५४**

एन. आय. बी. एम. रस्त्याचे उर्वरीत विकसन व डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे. सनशाईन पेव्हींग्ज प्रा. लि. (एल - १) यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,९८,८०९/-पेक्षा १९.००% जास्त) (तडजोडीने)असल्याने त्यांचेकडून र.रुपये १,१८,९८,५८२=७१ पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या बाबींचे भाववाढ सूत्रानुसार येणाऱ्या रकमेसह करुन घेण्यासाठी त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१२१ दि. १४/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २५५**

कसबा मतदार संघातील कागदीपुरा दफनभूमीमध्ये सुधारणा कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे. सुवर्णा कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९,९७,९८९/-पेक्षा १४.९९% जास्त)असल्याने त्यांचेकडून र.रुपये ११,४७,५८७=५५ पर्यंत काम करुन घेण्यास व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/भवन/१२३ दि. १४/५/२००७ चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. २५६**

मा.विजय देशमुख व मा.प्रमोद भानगिरे यांचे दि. २२/३/२००७ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. २०१७ दि. २७/२/२००७ चा फेरविचार करावा. (पुणे मनपा कामकाजासाठी टुरिस्ट परवाना असलेली वाहने घेणेबाबत)

(सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. ३/५/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. २५७**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षाकरीता करमणूक कर व मिळकतकर दर निश्चित करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/वसुली/८१ दि. ३०/४/२००७ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. ८/५/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. २५८**

सन २००७-२००८ पाणीपट्टीच्या विविध दरांमध्ये व शुल्कांमध्ये करावयाचे बदलाबाबतचे मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/पापु/८२ दि. ३०/४/२००७ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. ८/५/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्रं. २५९**

वडगाव जलशुध्दीकरण केंद्रापासून कॅनॉल नजीकच्या नाल्यापर्यंत १४०० मि. मी. व्यासाची आर. सी. सी. व एम. एस. ड्रेनेज लाईन टाकणे या सर्वात कमी दराचे ठेकेदार मे. आर. बी. कृष्णानी यांचेकडून त्यांचे टेंडर दरानुसार वाढीव र.रु. ९७,८९,०४२=६३ रकमेचा दुरुस्त करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/पापु/प्र/११४ दि. १४/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २६०**

पुणे महानगरपालिकेच्या वेगवेगळ्या उद्यानामध्ये कार्यक्रमास / उपक्रमास परवानगी देणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उद्यान/१२५ दि. १४/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २६१**

पुणे महानगरपालिका व बहुजन महामानव जयंती महोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ११ ते १५ एप्रिल २००७ या कालावधीत समता भूमी, महात्मा फुले वाडा, महात्मा फुले पेठ, पुणे येथे महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने ''फुले-आंबेडकर फेस्टीव्हल २००७'' चे आयोजन मा. महापौर यांचे सूचनेवरुन करण्यात आले असून सदरचे कार्यक्रमासाठी झालेल्या

एकूण र.रु. ४१,७१५/- चे खर्चास व सदरचा खर्च खालील अर्थशिर्षकावर खर्ची टाकून संबंधितांना अदा करण्यास मान्यता मिळण्याबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. १०३५ दि. १४/५/२००७ चे पत्र.
सन २००७ - २००८ चे विशेष अंदाजपत्रक (दि. १एप्रिल २००७ ते दि.३१ जुलै २००७)
१ मुख्य देखरेख, वसुली वगैरे
क. मनपा नि स्थायी समिती
१. नगरसचिव यांचे कार्यालय
३. संकिर्ण

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मयुर फोटो स्टुडिओ | ३४६४,दि.१६/४/२००७ | र.रु. ११५=०० |
| २) | मे. वेदफाटक क्रिएशन्स | ०१७९, दि.७/५/२००७ | र.रु. १०,८००=०० |
| ३) | मे. एम. आर. धाडगे | ०१३३, दि.१८/४/२००७ | र.रु. २,८००=०० |
| ४) | बहुजन महामानव जयंती महोत्सव समितीचे निवेदन | ००००, दि.५/५/२००७ | र.रु. २८,०००=०० |
| | | एकूण रक्कम रुपये | र.रु. ४१,७१५=०० |

**विषय क्रं. २६२**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त शनिवार,दिनांक १४ एप्रिल २००७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, पुणे ४११ ००१ येथे पुणे महानगरपालिकेतर्फे श्रीफळ, डॉ. बाबासाहेबांचे संबंधीत पुस्तके, गुलाब पुष्प, मिरवणूकीचे स्वागत प्रसंगी वाटप करण्यात आले. सदर समारंभ प्रित्यर्थ आलेल्या र.रु. ३६,४४७=०० (र.रु. छत्तीस हजार चारशे सत्तेचाळीस फक्त) चे खर्चास व सदर खर्चाची बिले खालील अर्थशिर्षकावर खर्ची टाकून संबंधितांना अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ११३८ दि. १७/५/२००७ चे पत्र.
सन २००७ - २००८ चे विशेष अंदाजपत्रक (दि. १ एप्रिल २००७ ते दि.३१ जुलै २००७ अखेर)
१ मुख्य देखरेख, वसुली वगैरे
क. मनपा नि स्थायी समिती
१. नगरसचिव यांचे कार्यालय
६. समारंभ खर्च तरतूद र.रु. १,००,०००/-
९फ डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती तरतूद र.रु. १६,६६७/-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मे. सुगावा प्रकाशन (पुस्तके) | २६१५,दि.१३/४/२००७ | र.रु. १,१२५=०० |
| २) | मे. सुगावा प्रकाशन (पुस्तके) | २६१६,दि.१३/४/२००७ | र.रु. २७,१५०=०० |
| ३) | मे. कोंडिबा हणमंतराव (श्रीफळ) | ४५७९, दि.१३/४/२००७ | र.रु. ४,५७५=०० |
| ४) | मे.एम.आर.धाडगे (पुष्पहार/गुलाबपुष्प) | ०१३२, दि.१४/४/२००७ | र.रु. २,४००=०० |
| ५) | मे. टाईम्स व्हिजन | ०२०६, दि.२५/४/२००७ | र.रु. १,१९७=०० |
| | | एकूण रक्कम रुपये | र.रु. ३६,४४७=०० |

**विषय क्र. २६३**

मा. आबा बागूल यांचे दि. १७/५/२००७ चे पत्र.

पुणे मनपाचे दरमहा मिळणारे उत्पन्न व अपेक्षित उत्पन्न तसेच त्यानुसार दरमहा झालेला खर्च याचा अहवाल दरमहा स्थायी समितीला माहितीसाठी सादर करावा.

**शरद समेळ**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

पुणे महानगरपालिका

**✽ स्थायी समिती ✽**

तहकुब खास सभा परिपत्र

(बजेट सभा)

**स्थायी समितीची विशेष (खास) तहकुब सभा (शनिवार दि. १९/५/२००७ रोजी तहकुब केलेली) गुरुवार दि. २४/५/२००७ रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता म.ज्योतिबा फुले सभागृहात (स्थायी समिती सभागृहात) भरेल.**

सदर सभेत सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पातील खर्च बाजुकडील खालील बाबींचा विचार होईल.

| अ.क्रं. | शिर्षक | पान क्रं. |
|---|---|---|
| १. | मुख्य देखरेख, वसुली वगैरे | ४६ ते ५५ |
| २. | प्राथमिक शिक्षण | ५५ |
| ३. | दुय्यम शिक्षण | ५६ |
| ४. | गलिच्छ वस्ती निर्मुलन | ५७ ते ५८ |
| ५. | लोकारोग्य | ५९ ते ६० |
| ६. | मुलांची आरोग्यविषय तपासणी व पौष्टीक अन्नपुरवठा | ६१ |
| ७. | रुग्णालये, प्रसूतिगृहे, औषधालये इ. | ६१ |
| ८. | मा.सभासदांसाठी व सेवकांसाठी आरोग्य सहाय्य योजना | ६२ |
| ९. | पथांची झाडलोट, कचरा वाहतुक नि मैला व मैलापाणी वाहतुक व्यवस्था | ६२ ते ६४ |
| १०. | पथ सुधारणा | ६५ ते ६६ |

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

पुणे महानगरपालिका
स्थायी समिती
<u>जागा पाहणी परिपत्रक</u>

**स्थायी समितीच्या दि. २२/५/२००७ च्या सभेत ठरल्याप्रमाणे खालील विषयाबाबत जागा पाहणी करण्यासाठी गुरुवार दि. २४/५/२००७ रोजी सकाळी १०:०० (दहा) वाजता मा.सदस्य, स्थायी समिती व संबंधित खात्याधिकाऱ्यांनी मा.अध्यक्ष, स्थायी समिती यांचे कार्यालयात उपस्थित रहावे ही विनंती.**

**विषय क्रं. १**

मित्रमंडळ चौक ते पूरम चौक दरम्यान रस्ता व फुटपाथ विकसित करणेबाबत मा. अति. महा. आयुक्त (वि) यांचे क्र.मआ/पथ/९४ दि. ७/५/२००७ चे पत्र.

(टिप :- ज्या खात्याच्या संबंधित विषयाची जागा पाहणी असेल त्या खात्यातील वरिष्ठ अथवा अन्य अधिकारी यांनी गाडी घेवून सदर दिवशी व वेळी उपस्थित रहावे, ही विनंती.)

नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

पुणे महानगरपालिका

**✼ स्थायी समिती ✼**

तहकुब खास सभा परिपत्र

(बजेट सभा)

**स्थायी समितीची विशेष (खास) तहकुब सभा (गुरुवार दि. २४/५/२००७ रोजी तहकुब केलेली) सोमवार दि. २८/५/२००७ रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता म.ज्योतिबा फुले सभागृहात (स्थायी समिती सभागृहात) भरेल.**

सदर सभेत सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पातील खर्च बाजुकडील खालील बाबींचा विचार होईल.

| अ.क्रं. | शिर्षक | पान क्रं. |
|---|---|---|
| १. | मुख्य देखरेख, वसुली वगैरे | ४८ ते ५४ |
| ३. | दुय्यम शिक्षण | ५६ |
| ४. | गलिच्छ वस्ती निर्मुलन | ५७ ते ५८ |
| ७. | रुग्णालये, प्रसूतिगृहे, औषधालये इ. | ६१ |
| ८. | मा.सभासदांसाठी व सेवकांसाठी आरोग्य सहाय्य योजना | ६२ |
| ९. | पथांची झाडलोट, कचरा वाहतुक नि मैला व मैलापाणी वाहतुक व्यवस्था | ६२ ते ६४ |
| १०. | पथ सुधारणा | ६५ ते ६६ |
| ११. | यांत्रिक | ६७ |
| १२. | भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था | ६९ |
| १३. | बांधकाम नियोजन, नगररचना व नगरविकास योजना | ७१ |
| १४. | अग्निशामक पथक | ७३ |
| १५. | अनुज्ञापत्र व आकाशचिन्हे, पथावरील अतिक्रमणे काढणे, कोंडवाडे | ७४ |

( सर्व मा. खात्याधिकाऱ्यांनी सभेला उपस्थित रहावे.)

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

पुणे महानगरपालिका

**✽ स्थायी समिती ✽**

कार्यपत्रिका क्रमांक १०

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २९/५/२००७** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.ज्योतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. २६६**

मा. श्रीमती माधुरी मिसाळ व मा. सौ. शुभदा जोशी यांचे दि. १८/५/२००७ चे पत्र.

वॉ.क्र. ७० मधील मिर्नव्हा व आर्यन येथील पार्किंग मधील तळमजल्यावर असणाऱ्या पार्किंग सोडून कडेला जी मोकळी जागा राहते त्या जागेचा उपयोग अन्य कोणत्याही कारणास्तव होत नाही. सदरच्या मोकळ्या जागेमध्ये स्टॉल टाकण्यात यावे. सदरचे स्टॉल टाकल्यामुळे त्यापासून पुणे मनपाला चांगल्याप्रकारचे उत्पन्न मिळणार आहे. तरी वरील दोन्ही ठिकाणच्या तळमजल्याच्या पार्किंगच्या पार्किंग सोडून उरलेल्या कडेच्या जागेत स्टॉल टाकण्यासाठी परवानगी देण्यात येवुन खात्या मार्फत योग्य ती कार्यवाही करावी.

**विषय क्र. २६७**

मा. सौ. उषाताई कळमकर व मा. सौ. अलका खाडे यांचे दि. १८/५/२००७ चे पत्र.

दिनांक ७,८ फेब्रुवारी २००८ मध्ये पुणे शहरात आशिया खंडातील ८ देशांच्या महिला पत्रकारांची परिषद पुणे शहरात होत आहे. या परिषदेसाठी देशातील सर्व महिला पत्रकारांना आमंत्रित केले आहे. यापुर्वी ही परिषद दिल्ली, बेंगलोर, हैद्राबाद, कलकत्ता येथे झाली होती. ह्या परिषदेसाठी पुणे महानगरपालिकेने ३ लाख रुपये आर्थिक सहाय्य करावे. या साठी पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या महिला व्यासपीठास सदर मदत करावी.

**विषय क्र. २६८**

मा. सुनिल टिंगरे व मा. विशाल तांबे यांचे दि. २१/५/२००७ चे पत्र.

टिंगरेनगर सावंत पेट्रोल पंप ते ५/९ या रस्त्यावरुन सामान्य नागरिकांसह, मा. सन्मानिय पदाधिकारी,अधिकारी यांना नियमित या रस्त्यावरुन जाणे-येणे होत असल्याने वाहतुकीची कोंडी मोठ्या प्रमाणात होत आहे. तसेच बऱ्याच वेळा या रस्त्यावर अपघात होत असतात. सदर रस्ता हा फारच अरुंद असून सदर रस्ता रुंद होणे अत्यंत आवश्यक आहे. तरी सदर रस्ता रुंद करुन सी. सी. करण्यात यावा. व त्याकरिता कारागृह व एअरफोर्स यांची योग्य ती मान्यता घेऊन लवकरात लवकर सदर रस्ता रुंद करुन सी. सी. करण्यात यावा.

**विषय क्र. २६९**

मा. सुनिल बनकर व मा. शंकरराव बेलदरे यांचे दि. २२/५/२००७ चे पत्र.

गुंठेवारी कामाची व्याप्ती पाहता नागरिकांचे बांधकाम लवकरात लवकर नियमित होण्यासाठी यापूर्वी करार पध्दतीने सहाय्यक अभियंता व कनिष्ठ अभियंता या पदावर सेवकांची करार पध्दतीने नेमणूक करण्यात आली होती. सद्यस्थितीत क्षेत्रिय कार्यालयांमध्ये सदरच्या कामासाठी लागणारा सेवकवर्ग उपलब्ध नसल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. तसेच गुंठेवारी नियमितीकरणातून पुणे महानगरपालिकेस मिळणारा महसूलही जमा होणेस विलंब होत आहे. या कारणास्त पुणे मनपाच्या नगर अभियंता कार्यालयातर्फे क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत सेवानिवृत्त सेवकांचे सहाय्यक अभियंता पदावर (१ सहाय्यक अभियंता दरमहा १०,०००/- रु.) या पदावर करार पध्दतीने नेमणूक करण्यात यावी.

**विषय क्र. २७०**

मा. रविंद्र धंगेकर व मा. ॲड. किशोर शिंदे यांचे दि. २२/५/२००७ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या इमारतीमध्ये सभासदांसाठी ग्रंथालय (अभ्यासिका) चालू करण्यात यावी.

**विषय क्र. २७१**

मा. रविंद्र धंगेकर व मा. राजेंद्र गोरडे यांचे दि. २२/५/२००७ चे पत्र.

नगरसचिव कार्यालयाकडील बिगारी सेवक श्रीधर रमेश सरोदे यांना घरगुती अडचणीमुळे नगरसचिव कार्यालयाकडे काम करणे गैरसोयीचे व अडचणीचे होत आहे. म्हणून त्यांना त्यांच्या मुळ खाते आरोग्य कार्यालय येथे परत जाणेबाबत व त्यांच्या रिकाम्या जागेवर आरोग्य कार्यालय किटक प्रतिबंधक विभाग येथील बिगारी सेवक अजय धनवडे यांना नगरसचिव कार्यालयाकडे कामास घेणेबाबत.

**विषय क्र. २७२**

मा. वसंत मोरे व मा. ॲड. किशोर शिंदे यांचे दि. २३/५/२००७ चे पत्र.

कात्रज येथील जकात नाका स्थलांतरीत झाल्यामुळे येथील जागा मोकळी झालेली आहे. या ठिकाणी बीआरटी च्या बांधकामा व्यतिरिक्त उरलेल्या मोकळ्या जागेवर पोलिस चौकी बांधणे आवश्यक आहे. येथील वाहतूक समस्या व कायदा व सुव्यवस्था राखण्याकरीता कात्रजच्या मध्यवर्ती भागामध्ये पोलिस चौकी असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे सदरील जागा पोलिस चौकीच्या वापराकरीता दिर्घ मुदतीच्या कराराने देण्यात यावी.

**विषय क्र. २७३**

मा. वसंत मोरे व मा. ॲड. किशोर शिंदे यांचे दि. २३/५/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. १४१ कात्रज गावठाण येथील कात्रज गावामधील अजिंक्य भैरवनाथ गणपती मंदिराशेजारील पुणे मनपाच्या अख्त्यारीतील अंदाजे २०० स्क्वेअर फूटचे तीन मोकळे गाळे महिला बचत गटातील महिलांकरिता उद्योगांकरिता वापरण्यास मिळण्याकरिता दिर्घ कराराने देण्यात यावी.

**विषय क्र. २७४**

मा. वसंत मोरे, मा. शंकरराव बेलदरे व मा. सुनिल बनकर यांचे दि. २४/५/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. १४१ कात्रज गावठाण अंतर्गत येणाऱ्या कात्रज गाव येथील पुणे मनपाच्या व्यायाम शाळेचे भाडे जास्त असल्याकारणाने अनेक दिवसा पासून ही बांधून दिलेली व्यायाम शाळा चालविण्यास कोणत्याही खाजगी संस्थेला आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने ही व्यायाम शाळा चालविण्यास कोणतीही खाजगी संस्था पुढे न आल्यामुळे या व्यायाम शाळेचे भाडे स्थानिक नागरिकांना परवडेल अशा पध्दतीने कमी करुन खाजगी संस्थेला चालविण्यास देण्यात यावी.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्रं. २७५**

दि. ७/५/२००७ ते दि. १३/५/२००७ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण २० आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/१३६ दि. १९/५/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. २७६**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ६/१/२००७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१)(अ) अनुसरुन दि. ५/५/२००७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/६२ दि. १९/५/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. २७७**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ३०/१२/२००६ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २८/४/२००७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/६३ दि. १९/५/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. २७८**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. १३/१/२००७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. १२/५/२००७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/६७ दि. २३/५/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**हिशोब तपासणी अहवाल**

**विषय क्रं. २७९**

उप आयुक्त वि यांचे नियंत्रणाखालील म. फुले मंडई अंतर्गत जुन्या मंडईतील गाळ्यांची सन २००४ - २००५ मधील गाळा भाडे आकारणी वार्षिक आकार जमाभाडे इत्यादीची गाळाभाडे रजिस्टर व तद्नुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह बाबींबाबत मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/६११ दि. १९/५/२००७ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ५२ सन २००६-२००७ चा विचारासाठी.

**सेवकवर्गाची प्रकरणे**

**विषय क्रं. २८०**

पुणे मनपाच्या विविध विभागाकडे असिस्टंट इलेक्ट्रीशियन वर्ग -३ या पदावर वरील मा. महा. आयुक्त यांच्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे १६ उमेद्वारांची करार पध्दतीने ६ महिने मुदतीसाठी नेमणूक करणेस व त्यांचे बरोबर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. म.आ./सहमआ/से/१३८ दि. १९/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २८१**

मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाकडील सेवकांची रजा मान्य करणेबाबत मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांचे क्र. मुलेप/६० दि. १९/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २८२**

नगर उप अभियंता (भवन रचना) कार्यालयाकडील सेवक श्री. लक्ष्मण रामचंद्र लोहकरे बिगारी वे. श्रे. (२६१०-५९६०) यांचे निलंबन काळास दि. १७/५/२००७ रोजी नववी सहामाही पूर्ण झाली असल्याने सदरची बाब मनपा सेवाविनियम क्र. ५८ मधील तरतूदीनुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/सहमआ/से/१४० दि. २३/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २८३**

नगरसचिव कार्यालयाकडील सेवकांची रजा मान्य करणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा. क्र. १३७८, दि. २४/५/२००७ चे पत्र.

## सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स

### विषय क्रं. २८४

पुणे महानगरपालिकेच्या मोटारींना लागणारे विविध प्रकारचे टायर सेट खरेदी करणेसाठी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६टेंडसपैकी खालील प्रमाणे तीन टेंडरदारांकडून १)मे. सिएट लि., पुणे यांचेकडून १०.००ु २० १६ पी आर क्रॉस लग्ज रु. ९१६२=०० प्रती टायर सेट प्रमाणे २०० सेट, ९.००ु २० १६पी आर हायवे पॅटर्न रु. ८२६२=०० प्रती टायर सेटप्रमाणे ५० सेट, ८.२५ु २० १६ पी आर रु. ६९१८=७५ प्रती टायर सेट प्रमाणे ५०सेट, १४.००ु २५ २० पी आर रुपये २६६९६=२५ प्रती टायर सेट प्रमाणे १५सेट, १५५/७० आर १३ रु. १७७९=७५ प्रती टायर सेट प्रमाणे ७५सेट, १६५ ६५ आर १३ रु. १८९२=२५ प्रती टायर सेट प्रमाणे १००सेट, १८५ ८५ आर १६ रु. २८०६=८८ प्रती टायर सेट प्रमाणे १०सेट, १८५ ८५ आर १६ १०५ पी आर रु. २८०६=८८ प्रती टायर सेट प्रमाणे ५०सेट व ७.००ु आर १५ रुपये ४१२३=१३ प्रती टायर सेटप्रमाणे २० सेट प्रमाणे अशी एकूण रक्कम रुपये ३५,६५,४६२=९० पर्यंत व्हॅट टॅक्ससह अनामत न घेता त्यांचे सर्व अटी स्विकारुन खरेदी करणेस. २) मे. मिशीगन रबर इंडीया लि., मध्यप्रदेश यांचेकडून १०.००ु २० १६पी आर हायवे पॅटर्न रु. ९२५६=५० प्रती टायर सेटप्रमाणे २५० सेट व ७.५०ु १६ १६पी आर हायवे पॅटर्न रु. ४१३३=२५ प्रती टायर सेटप्रमाणे २५० सेटअशी एकून रक्कम रुपये ३३,४७,४३७=५० पर्यंत व्हॅट टॅक्ससह अनामत न घेता त्यांचे सर्व अटी स्विकारुन खरेदी करणेस.३) मे. एम.आर. एफ. लि., पुणे यांचेकडून १६५ ८० आर १५ रुपये १८२५=०८ प्रती टायर सेट प्रमाणे १५० सेट व २१५ु आर १४ रुपये ४९६२=५७ प्रती टायर सेट प्रमाणे १० सेट अशी एकून रक्कम रुपये ३२,३३,८७=७० पर्यंत व्हॅट टॅक्ससह अनामत न घेता त्यांचे सर्व अटी स्विकारुन खरेदी करणेस व खरेदीपोटी होणाऱ्या रकमेपर्यंत त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उआ(तां)/१३० दि. १९/५/२००७ चे पत्र.

### विषय क्रं. २८५

पुणे महानगरपालिकेच्या विद्युत खात्यासाठी ७० वॅट सोडीयम व्हेपर एच. पी. एस. व्ही. सॉन टी टाईप दिवे खरेदी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी मे. धुपर ब्रदर्स यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे असल्याने त्यांचेकडून ७० वॅट सोडीयम व्हेपर एच. पी. एस. व्ही. सॉन टी टाईप मेक - फिलीप्स प्रती नगास र.रु. १५९=९० प्रमाणे १०००० नगासाठी र.रु.१५,९९,०००=०० (सर्वकरासह) पर्यंतचे खरेदी करणेस व खरेदीपोटी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उआ(तां)/१३१ दि. १९/५/२००७ चे पत्र.

### विषय क्रं. २८६

येरवडा स. ११०, १११ शांतीनगर झोपडपट्टीची, नाला काठावरील अर्धवट राहिलेली भिंत पूर्ण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे. पिलाने-ढावरे कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६८,५४,९११=०८ पेक्षा २.५०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ७०,२६,२८३=८६ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यास व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उद्यान/१३२ दि. १९/५/२००७ चे पत्र.

### विषय क्रं. २८७

पाणी पुरवठा खात्याकडील विविध जलकेंद्रासाठी पॉलिॲल्युमिनियम क्लोराईड अउ १०० ड द्रावण व पावडर (मेक - ग्रासिम) खरेदी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे. एस. व्ही. एस. केमिकल कॉर्पो. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून काम करुन घेणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/१३३ दि. १९/५/२००७ चे पत्र.

१) मे. एस. व्ही. एस. केमिकल कॉर्पो. ५२०, नवा रास्ता पेठ, पुणे - ११ यांचेकडून सन २००७-०८ सालासाठी लागणारे पी. ए. सी. ए सी १०० द्रावण व पावडर एकूण परिमाण अनुक्रमे २०७५ मे. टन व २०० मे. टन एकूण दर अनुक्रमे ८,१००/-+४% वॅट व २५,१००/- + ४% वॅट या प्रमाणे होणारी एकूण रक्कम रुपये २,२७,००,६००=०० पर्यंत खरेदी करणे.

२) सदर खरेदीपोटी त्यांचेशी करारनामा करणे.

३) सदर केमिकलच्या पुरवठादाराने केलेल्या पुरवठ्यापोटी पुरवठादारास बिले आदा करणेस.

**विषय क्रं. २८८**

सहकारनगर क्षेत्रिय कार्यालयाचे हद्दीतील प्रमुख चौकात मास्टीक अस्फाल्ट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे. नंदकुमार कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २७,००,०००/- पेक्षा अॅटपार)असल्याने त्यांचेकडून र.रुपये २७,००,०००/- पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालवधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१३४ दि. १९/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २८९**

पुणे महानगरपालिकेच्या मोटारींना लागणारे ऑईल व ग्रीस खरेदी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी खालीलप्रमाणे तीन टेंडर्सदारांकडून १) मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमी. यांचेकडून १५-डब्ल्यु-४० ऑईल प्रतिलिटर ७९=६१ प्रमाणे ९० बॅरल (१८९०० लिटर्स), २० - डब्ल्यु - ४० ऑईल प्रतिलिटर प्रमाणे ७०=५९प्रमाणे ५० बॅरल (१०५०० लिटर्स), व हायड्रॉलिक ६८ ऑईल प्रतिलिटर ६४=९७ प्रमाणे २२५ बॅरल (४७२५० लिटर्स) एकूण रुपये ५३,१५,६५६=५० पर्यंत आवश्यकतेनुसार त्यांचे सर्व अटी स्विकारुन खरेदी करण्यास.

२) मे. अपार इंडस्ट्रीज लिमी. यांचेकडून गिअर ऑईल एस ए ई - १४० प्रतिलिटर ७६=३१ प्रमाणे १० बॅरल (२०९०लिटर्स), गिअर ऑईल ए टी एफ टाईप ए प्रतिलिटर ७९=०४ प्रमाणे १५ बॅरल (३१३५ लिटर्स), डब्ल्यु.बी.ग्रिस प्रति किलो ८०=४० प्रमाणे २ बॅरल (३६४ किलो) व एम.पी.ग्रिस प्रति किलो ८०=४० प्रमाणे १५ बॅरल (२७३० किलो) एकूण रुपये ६,५६,०३५=९० पर्यंत आवश्यकतेनुसार त्यांचे सर्व अटी स्विकारुन खरेदी करण्यास.

३) मे.हिन्दुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमी यांचेकडून गिअर ऑईल एस ए ई - ९० प्रतिलिटर ७२=९६ प्रमाणे १० बॅरल (२१०० लिटर्स), गिअर ऑईल एस ए ई - ८० प्रतिलिटर ६८=४५ प्रमाणे १० बॅरल (२१०० लिटर्स) एकूण रुपये २,९६,९६१=०० पर्यंत आवश्यकतेनुसार त्यांचे सर्व अटी स्विकारुन खरेदी करणेस (म्हणजेच मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमी. यांचेकडून रुपये ५३,१५,६५६=५०, मे. अपार इंडस्ट्रीज लिमी. यांचेकडून रुपये ६,५६,०३५=९० व मे. हिन्दुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमी. यांचेकडून रुपये २,९६,९६१=०० अशी एकूण रक्कम रुपये ६२,६८,६५३=४० पर्यंत खरेदी होणार आहे.) व खरेदीपोटी होणाऱ्या रकमेपर्यंत त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उआ(तां)/१३९ दि. २१/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २९०**

बहिरोबा मैलापाणी शुध्दीकरण केंद्राकडे येणाऱ्या मुख्य मलवाहिनीची देखभाल दुरुस्ती, साफसफाई व कनेक्टिव्हिटीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे. सिध्दिविनायक एंटरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १४,९९,९९७=०० पेक्षा ९.३५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १३,५९,७४७=२८ पर्यंत काम करुन घेण्यास व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/अनअभि/ड्रेनेज/१४२ दि. २४/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २९१**

सूस रस्ता ते बाणेर पाषाण शिव रस्ता जोडणारा १२ मी. डी.पी. रस्ता येथे खडीकरण व ग्राऊट करणे (फेर टेंडर) कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे. राजकुमार कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,९५,१३०=०० पेक्षा १६.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १६,७५,९०९=२० पर्यंत काम करुन घेण्यास व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१४३ दि. २४/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २९२**

टिळक रस्ता क्षेत्रिय कार्यालयाचे हद्दीतील प्रमुख चौकात मास्टीक अस्फाल्ट कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे. नंदकुमार कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २७,००,०००=०० पेक्षा ९.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २४,५७,०००=०० पर्यंत काम करुन घेण्यास व टेंडरमधील डांबर, सिमेंट आणि स्टील या बाबींच्या भाववाढ सूत्रानुसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यास व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१४४ दि. २४/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २९३**

धनकवडी तळजाई पठारावरील अस्तित्वातील रस्ते पेव्हरने डांबरीकरण कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे. सनशाईन पेव्हींग्ज प्रा. लि. यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १५,३०,५४१=०० पेक्षा १९.५०% जास्त(तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १८,२८,९९६=५० पर्यंत काम करुन घेण्यास व टेंडरमधील डांबर, सिमेंट आणि स्टील या बाबींच्या भाववाढ सूत्रानुसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यास व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१४५ दि. २४/५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २९४**

औंध येथे मुस्लिम कब्रस्तान करणे (भाग २) या कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडसपैकी ठेकेदार मे. आर.आर. धोत्रे यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १४,२४,३९९=०० पेक्षा १८.७२% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ११,५७,७५१=५१ पर्यंत काम करुन घेण्यास व टेंडरमधील रकमेपर्यंत काम करून घेण्यास व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/भवन/१४६ दि. २४/५/२००७ चे पत्र.

## सर्वात जास्त रकमेची टेंडर

**विषय क्रं. २९५**

बालगंधर्व रंगमंदिर येथील कॅन्टीन व कॅफेटेरिया मक्ता देणेबाबत निविदा मागविल्या असता आलेल्या ३ निविदांपैकी मे. श्लोका केटरर्स यांची निविदा सर्वात जास्त रकमेची असल्याने त्यांनी दिलेली वार्षिक मक्ता फी रुपये ६,१५,४००/- स्विकारुन प्रथमत: एक वर्ष मुदतीसाठी व पुढे त्यांचे काम समाधानकार असल्यास प्रतिवर्षी १२% मक्ता फी वाढ आकरुन त्यापुढे २ वर्षे मुदतीसाठी निविदा शर्ती व अटी नुसार ठेका देणेस व त्याकरिता सदर ठेकेदाराबरोबर जरुर तो करारनामा करुन घेणेस मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/ सहआ(जिं.घ.)/ १४१ दि. २३/५/२००७ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. २९६**

मा.चंद्रकांत मोकाटे व मा.प्रशांत बधे यांचे दि. ३१/१०/२००६ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र.१२९९ दि. ३१/१०/०६ चा फेरविचार करुन मा.महा.आयुक्त यांचे मुळ विषयपत्र दप्तरी दाखल करावे. (पुणे सोलापूर रस्त्यावर गाडीतळ ते स्वारगेट दरम्यान बी.आर.टी.साठी पॉलिमर काँक्रीट ब्लॉक पुरविणे व बसविणेबाबत)

(टिप :- सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. २४/४/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २९७**

मा.चंद्रकांत मोकाटे व मा.प्रशांत बधे यांचे दि. ३१/१०/२००६ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र.१३२२ दि. ३१/१०/०६ चा फेरविचार करुन मा.महा.आयुक्त यांचे मुळ विषयपत्र दप्तरी दाखल करावे. (पुणे सोलापूर रस्त्यावर बी.आर.टी.प्रकल्पाकरीता पूलगेट बसस्थानक येथे टर्मिनल विकसित करणेबाबत)

(टिप :- सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. २४/४/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २९८**

मा.प्रशांत बधे व मा.चंद्रकांत मोकाटे यांचे दि. ३१/१०/२००६ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र.१३२१ दि. ३१/१०/०६ चा फेरविचार करुन मा.महा.आयुक्त यांचे मुळ विषयपत्र दप्तरी दाखल करावे. (पुणे सोलापूर रस्त्यावर बी.आर.टी.प्रकल्पाकरीता सासवड जंक्शन येथे टर्मिनल विकसित करणेबाबत)

(टिप :- सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. २४/४/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २९९**

मा.चंद्रकांत मोकाटे व मा.प्रशांत बधे यांचे दि. ३१/१०/२००६ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र.१३२० दि. ३१/१०/०६ चा फेरविचार करुन मा.महा.आयुक्त यांचे मुळ विषयपत्र दप्तरी दाखल करावे. (पुणे सोलापूर रस्त्यावर बी.आर.टी.करीता सिग्नल पुरविणे व बसविणेबाबत)

(टिप :- सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. २४/४/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३००**

मा.प्रशांत बधे व मा.चंद्रकांत मोकाटे यांचे दि. ३१/१०/२००६ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र.१३१९ दि. ३१/१०/०६ चा फेरविचार करुन मा.महा.आयुक्त यांचे मुळ विषयपत्र दप्तरी दाखल करावे. (पुणे सोलापूर रस्त्यावर धोबीघाट ते पंचमी हॉटेल स्वारगेट दरम्यान बी.आर.टी.सायकल ट्रॅक करणेबाबत)

(टिप :- सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. २४/४/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३०१**

मा.चंद्रकांत मोकाटे व मा.प्रशांत बधे यांचे दि. ३१/१०/२००६ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र.१३१८ दि. ३१/१०/०६ चा फेरविचार करुन मा.महा.आयुक्त यांचे मुळ विषयपत्र दप्तरी दाखल करावे. (पुणे सोलापूर रस्त्यावर गाडीतळ ते भैरोबानाला दरम्यान बी.आर.टी.लेन तयार करणेबाबत)

(टिप :- सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. २४/४/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३०२**

मा.चंद्रकांत मोकाटे व मा.प्रशांत बधे यांचे दि. ३१/१०/२००६ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र.१३१७ दि. ३१/१०/०६ चा फेरविचार करुन मा.महा.आयुक्त यांचे मुळ विषयपत्र दप्तरी दाखल करावे. (पुणे सातारा रस्त्यावर बी.आर.टी.करीता सिग्नल पुरविणे व बसविणेबाबत)

(टिप :- सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. २४/४/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. ३०३**

सहजानंद सोसायटी ते आशिष गार्डन दरम्यानचा रस्ता सेन्सर पेव्हर फिनिशरने डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.प्रविण पाटील यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १,०९,१४,१७५/- पेक्षा ९.७७% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १,१९,८०,४८९=९० पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालवधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/९९ दि. ७/५/२००७ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.)

**विषय क्रं. ३०४**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षाकरीता करमणूक कर व मिळकतकर दर निश्चित करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/वसुली/८१ दि. ३०/४/२००७ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.)

**विषय क्रं. ३०५**

पुणे महानगरपालिकेच्या वेगवेगळ्या उद्यानामध्ये कार्यक्रमास / उपक्रमास परवानगी देणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उद्यान/१२५ दि. १४/५/२००७ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.)

**विषय क्रं. ३०६**

मित्रमंडळ चौक ते पूरम चौक दरम्यान रस्ता व फुटपाथ विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.ओम अभिषेक एंटरप्रायजेस यांचे एकच टेंडर (टेंडर र.रु. १९,९७,१९०/- पेक्षा १२% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २२,३६,८५२=८० पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/९४ दि. ७/५/२००७ चे पत्र.

(टिप:- दि.२४/५/२००७ रोजी जागा पाहणी झाली)

**संकिर्ण**

**विषय क्रं. ३०७**

औंध क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात मुख्य रस्त्यावर पावसाळी लाईन टाकणे कामी मे. विनोद मुथा यांचेकडून काम दिडपटीपर्यत म्हणजे र.रु. १,६८,३६,५७७=५० पर्यंत त्यांचे टेंडर दराने करुन घेण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/पथ/१२९ दि. १९/ ५/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ३०८**

मनपाचे विविध विभागांना शासकीय कामकाजासाठी भाडे तत्वावर मे. चिन्नु ट्रॅव्हल्र्स यांचेकडून वाढीव काम करून घेतल्या बद्दल भाडेतत्वावर टुरिस्ट परवाना असलेल्या मोटारींची वाढीव रक्कम रु. १३,७०,०००/- आदा करणेस व करार करणेस पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उआ(तां)/१३७ दि. १९/ ५/२००७ चे पत्र.

(म्हणजेच टेंडर क्र. १०/२००५-०६ मधील पूर्वीची मान्य रक्कम रु. १,९३,००,०००/- आणि वाढीव रु. १३,७०,०००/- अशी एकूण रु. २,०६,७०,०००/- पर्यंत काम होईल.)

**विषय क्रं. ३०९**

दिनांक ११/५/२००७ रोजी प्रभाग समिती अध्यक्ष पदाचे निवडणूक कार्यक्रम प्रसंगी मा. महापौर यांनी दुपारच्या भोजनाची व्यवस्था मा. नगरसेवक, मा. अधिकारी यांचे करीता केली होती, १५३ व्यक्तींच्या स्नेह भोजना प्रित्यर्थ मे. हॉटेल दुर्वांकुर डायनिंग हॉल यांनी सादर केलेले रक्कम रुपये १५,३००/- चे बिल खालील अर्थशिर्षकावर खर्ची टाकून संबंधितांना अदा करण्यास मान्यता मिळण्याबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. १३०७ दि. २२/५/२००७ चे पत्र.

सन २००७ - २००८ चे विशेष अंदाजपत्रक

१ मुख्य देखरेख, वसुली वगैरे

क. मनपा नि स्थायी समिती

१. नगरसचिव यांचे कार्यालय

२५. मा. महापौर यांनी बोलाविलेल्या सभेच्यावेळी केलेला खर्च तरतूद र.रु.१,५०,०००/-

**शरद समेळ**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**